❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# परीक्षेसाठी ३० मिनिटे आधी उपस्थित राहणं बंधनकारक; मुंबई विद्यापीठाचा नियम

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई विद्यापीठातर्फे परीक्षा पद्धतीत शिस्त आणण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून मुंबई विद्यापीठ आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेच्या तब्बल 30 मिनिटे आधी परीक्षा कक्षात उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ, व्यवस्थापन परिषद आणि विद्वत परिषदेच्या बैठकीत या महत्त्वपूर्ण नियमावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. आगामी सर्व शैक्षणिक सत्र आणि परीक्षांसाठी हा नियम काटेकोरपणे लागू केला जाणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे ओळखपत्र तपासणे, आसनव्यवस्था शोधणे, बायोमेट्रिक किंवा इतर आवश्यक पडताळणी प्रक्रियांसाठी पुरेसा वेळ लागतो. शेवटच्या क्षणी धावपळ करणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, अलीकडच्या काळात होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांना आळा घालणे आणि खबरदारीचा उपाय म्हणूनही विद्यापीठाने ही कडक नियमावली तयार केली असल्याचे समजते. विद्यापीठाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, जर एखाद्या परीक्षेची वेळ सकाळी 10.30 वाजता



असेल, तर सर्व विद्यार्थ्यांना सकाळी 10 वाजेपर्यंत परीक्षा कक्षात आपापल्या जागेवर उपस्थित राहावेच लागेल. निर्धारित वेळेपेक्षा उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश मिळणे कठीण होऊ शकते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी शेवटच्या क्षणी येणे टाळावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे यांनी यासंदर्भात अधिकृत पत्रक जारी केले आहे. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, उपपरिसरांचे समन्वयक आणि संस्थाचालकांनी हा नवा नियम सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच परीक्षा कर्मचाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणून द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. परीक्षा अत्यंत सुरळीत, शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्व नियमांचे पालन करून परीक्षा कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

# अन्नभेसळ करणाऱ्यांवर 'मकोका'

■ मुंबई (दै. संध्या)

अन्नभेसळीविरोधात तुकाराम मुंढेंचा धडाका:CM देवेंद्र फडणवीसांकडून कारवाईचे कौतुक, म्हणाले- अशी धडक कारवाई सुरू राहील

आयएएस तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून संपूर्ण राज्यात भेसळयुक्त खाद्यपदार्थ आणि आरोग्यास हानीकारक उत्पादनांवर कारवाईचा धडाका लावला आहे. एफडीएच्या पथकांकडून दररोज राज्यभरात धाडी टाकून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या तसेच अस्वच्छता बाळगणाऱ्या हॉटेल्स, डेअरी व दुकानांचे परवाने थेट निलंबित केले जात आहेत. दरम्यान, मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या धडक आणि आक्रमक मोहिमेची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी तुकाराम मुंढे यांच्या कामाच्या संदर्भात तसेच त्यांनी सुरू केलेल्या मोहिमेसंदर्भात विचारले असता फडणवीस म्हणाले, भेसळयुक्त पदार्थांमुळे एखाद्याच्या जीवाला धोका असतो. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता होती आणि ही कारवाई सध्या सुरू आहे, याचा मला आनंद आहे. तसेच यापुढेही एफडीएची अशी धडक कारवाई सुरू राहील, असे फडणवीस यांनी म्हटले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे



यांच्यात 11 ऑगस्ट रोजी सह्याद्री अतिथीगृहावर एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून राज्यात सुरू असलेल्या धडक कारवायांची सविस्तर माहिती उपमुख्यमंत्र्यांना दिली.

यावर कठोर पावले उचलत, दूध, पनीर, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या गुन्हेगारांवर थेट 'मकोका' अंतर्गत कारवाई करून त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याचे कडक आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. खाद्यपदार्थांमधील भेसळीचा नागरिकांच्या आरोग्यावर अत्यंत गंभीर आणि घातक परिणाम होत असल्याने अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणे काळाची गरज असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

तसेच, या प्रकरणांची न्यायालयात सुनावणी होताना कोणतीही कायदेशीर पळवाट किंवा त्रुटी राहू नये, यासाठी अनुभवी कायदेतज्ज्ञांची मदत घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी या हेतूने तातडीने एका विशेष कायदेशीर पथकाची स्थापना करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# थोडक्यात...

## झाडू मारताना पाहून अभिजीत दिपके संतापले

हिंगोली : दैनिक संध्या

कॉकरोच जनता पार्टीच संस्थापक अभिजीत दिपके यांनी मंगळवारी 'स्कूल ठीक करो' अभियानातंर्गत हिंगोलीच्या ढेगस गावातील सरकारी शाळेला भेट दिली. यावेळी घडलेल्या एका प्रकारामुळे अभिजीत दिपके चांगलेच संतापले. अभिजीत दिपके शाळेची पाहणी करत असताना एका वर्गात लहान विद्यार्थी झाडू मारत असल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे अभिजीत दिपके यांचा पारा चांगलाच चढला. त्यांनी लहान मुलांना विचारले की, 'तुम्हाला वर्गात झाडू मारायला कोण सांगतं?' त्यावर शिक्षकांनी विद्यार्थी स्वत:च्याच मनाने करतात, असे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावर अभिजीत दिपके आणखी संतापले. विद्यार्थी त्यांच्या मनाने झाडू मारत नाहीत. हे चुकीचं आहे. ती लहान मुले आहेत. ती शाळेत शिकण्यासाठी येतात. तुम्ही त्यांच्याकडून झाडू मारुन घेणार का, असा सवाल अभिजीत दिपके यांनी शिक्षकांना विचारला. यानंतर अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांनाही झाडू न मारण्याविषयी बजावले. याच्यानंतर कोणी झाडू मारायचा नाही शाळेत, तुम्ही फक्त शिकायला यायचं शाळेत. साफसफाई करायची नाही. पुन्हा असं घडलं तर मला फोन करा, असे अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. यानंतर दिपके यांनी मुलांना शाळेत काय-काय हवं असे विचारले. यावर मुलांनी बाथरुम, वह्या-पुस्तकं, पेन, कपडे, फळा, बुटं, दार, अशा मागण्यांचा पाढा वाचला. हिंगोली जिल्ह्यातल्या जिल्हा परिषद शाळा लिंबाळा या शाळेला भेट दिली होती, या शाळेमध्ये मुख्याध्यापकच भर दिवसा शाळेमध्ये दारू पिऊन राहतो असं निदर्शनास आलं होतं, संबंधित मुख्याध्यापक विनोद कटके हा शाळेतच दारू पीत असल्याचे व्हिडिओ अभिजीत दिपके यांनी समोर आणले होते.

# खड्ड्याने घेतला ११ वर्षांच्या ऋषभचा जीव

■ पुणे (दै. संध्या)

रस्त्यांवरील खड्डे आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा पुन्हा एकदा एका निष्पाप जीवाच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा आरोप होत आहे. पुण्यातील बालेवाडी-म्हाळुंगे परिसरात सोमवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात 11 वर्षीय ऋषभ संदीप पाटोळे याचा जागीच मृत्यू झाला. वडील, मुलगा आणि मुलगी दुचाकीवरून जात असताना रस्त्यातील मोठ्या खड्ड्यामुळे दुचाकी घसरली. त्यानंतर रस्त्यावर पडलेला ऋषभ मागून येणाऱ्या आयशर ट्रकच्या चाकाखाली आला. या दुर्घटनेचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, त्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर परिसरात संतापाचे वातावरण आहे. ही दुर्घटना सोमवारी सायंकाळी सुमारे 7 वाजण्याच्या सुमारास महाळुंगे येथील ग्रीन कोट सोसायटीसमोरील दुर्गा कॅफेजवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, ऋषभ आपल्या वडिलांसोबत दुचाकीवरून जात होता. रस्त्यावरील खड्ड्यामुळे दुचाकीचा तोल गेला आणि ती घसरली. यावेळी मागे बसलेला ऋषभ रस्त्यावर पडला. त्याचवेळी मागून आलेल्या आयशर ट्रकखाली तो आला. ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

# मुख्य आरोपी सचिन अंदुरेला जामीन, जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी (18 ऑगस्ट) महत्त्वाचा निर्णय दिला. 2013 मधील या हत्येप्रकरणी पुणे सत्र न्यायालयाने दोषी ठरवलेल्या सचिन अंदुरे याला उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, त्याला सुनावण्यात आलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. या निर्णयामुळे



तब्बल 13 वर्षांपासून सुरू असलेल्या दाभोलकर हत्या प्रकरणाला पुन्हा एकदा वेगळे वळण मिळाले आहे. यापूर्वी याच प्रकरणातील दुसरा दोषी शरद कळसकर यालाही मुंबई उच्च न्यायालयाने एप्रिल 2026मध्ये जामीन दिला होता. त्यामुळे दाभोलकर हत्या प्रकरणात सत्र न्यायालयाने दोषी ठरवलेले दोन्ही आरोपी सध्या जामिनावर बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर हे अंधश्रद्धा, अघोरी प्रथा आणि समाजातील बुवाबाजीविरोधात सातत्याने जनजागृती करणारे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून अंधश्रद्धेविरोधात मोठी चळवळ उभी केली होती. 20 ऑगस्ट 2013 रोजी सकाळी पुण्यातील ओंकारेश्वर परिसरातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर मॉर्निंग वॉक करत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात दाभोलकरांचा मृत्यू झाला. या हत्येने महाराष्ट्रासह देशभरात खळबळ उडाली होती. सुरुवातीला पुणे पोलिसांकडे या प्रकरणाचा तपास होता. मात्र तपासाच्या प्रगतीबाबत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने २०१४ मध्ये हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आले. त्यानंतर सीबीआयने हत्येचा कट, आरोपी आणि हल्लेखोरांचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांच्यावर दाभोलकर यांच्या हत्येत प्रत्यक्ष सहभागाचा आरोप ठेवण्यात आला. सीबीआयच्या तपासानुसार दोघांनी हत्येत भूमिका बजावल्याचा दावा करण्यात आला होता.

# शेकहँड केला अन् थेट गोळ्या झाडल्या

■ नाशिक (दै. संध्या)

नाशिकमधील गोसावीवाडी परिसरात जुन्या वादातून एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सुमित अरुण पगारे असे मृत तरुणाचे नाव असून, रविवारी सायंकाळी ही घटना घडली. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात 14 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अवघ्या काही तासांत कारवाई करत 12 संशयितांना अटक केली आहे. या प्रकरणी सुमित भाटिया यांनी नाशिकरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास सुमित पगारे, सुमित भाटिया आणि आकाश बोर्डे हे तिघे गोसावीवाडीतील टिळे हॉस्पिटल समोरील गंगोत्री जनता स्टोअर येथे पानमसाला खरेदी करण्यासाठी गेले होते. याच वेळी चौदा जणांचा एक गट तेथे आला आणि त्यांनी जुन्या वादाचा मुद्दा उपस्थित करत तिघांसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली. मात्र, काही क्षणांतच या वादाचे रूप हिंसक हल्ल्यात बदलले.



फिर्यादीत नमूद केल्यानुसार, राजिक शेख याने सुमित पगारेला 'आपल्यातील वाद कायमचा मिटवू' असे सांगत त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा केवळ एक बहाणा होता. हात मिळवताना राजिक शेख याने कमरेला लावलेले पिस्तूल बाहेर काढले आणि सुमित पगारेच्या पोटावर सलग दोन गोळ्या झाडल्या. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या सुमित पगारेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त किशोर काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त अद्विता शिंदे आणि नाशिकरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्यासह गुन्हे शोध पथक घटनास्थळी दाखल झाले. हत्येनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. गोसावीवाडी परिसरात दिवसभर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. प्राथमिक तपासात पूर्ववैमनस्य आणि वर्चस्वाच्या वादातून ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.


या प्रकरणात नाशिकरोड पोलीस ठाण्यात 14 संशयितांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अवघ्या 24 तासांत 12 संशयितांना बेड्या ठोकल्या आहेत. तर मुख्य गोळीबार करणारा संशयित आणि आणखी एका आरोपीचा पोलिसांकडून सध्या शोध सुरू आहे.

# राहुल नार्वेकरांचे सगळेच निर्णय चुकले : सिब्बलांचा धडाधड युक्तिवाद

■ मुंबई (दै. संध्या)

राहुल नार्वेकरांनी आधीच निष्कर्ष काढून ठेवला होता आणि त्यानुसार त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या बाजूने निर्णय दिला. आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय आधी घ्यायला हवा होता. त्यानंतर निवडणूक आयोगाने पक्ष कुणाचा याचा निर्णय देणं अपेक्षित होतं. पण शिवसेनेच्या प्रकरणात ही प्रक्रिया उलटी झाल्याचा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. विधिमंडळातील बहुमत आणि राजकीय पक्षाची ओळख या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे 39 आमदार शिंदे गटाकडे होते म्हणून तोच मूळ शिवसेना पक्ष ठरू शकत नाही. या संबंधित विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेला निर्णय चुकीचा होता, असा मोठा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. विधानसभा अध्यक्षांनी शिवसेनेची 1999ची घटना आधार मानली आणि पक्षाच्या अंतर्गत घटनात्मक रचनेची चौकशी करण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना कुणी दिला, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

आमदारांचे बहुमत म्हणजेच राजकीय पक्षाचे बहुमत मानता येईल का? विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष यांच्यातील फरक दुर्लक्षित करता येईल का? आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय होण्यापूर्वी त्यांच्या संख्येच्या आधारे 'खरा पक्ष' ठरवता येईल का? विधानसभा अध्यक्षांना पक्षघटनेची वैधता तपासून 1999 ची घटना लागू करण्याचा अधिकार होता का? 2018 ची पक्षघटना आणि त्या आधारे अस्तित्वात आलेली नेतृत्व रचना बाजूला सारून शिंदे गटाला केवळ आमदारांच्या




दहाव्या अनुसूचीतील कलम 2(1)(a) च्या संदर्भात सिब्बल यांनी मांडले की, शिंदे गटातील आमदारांच्या कृतींवरून त्यांनी स्वेच्छेने शिवसेनेचे सदस्यत्व सोडले का, हा प्रश्न तपासणे आवश्यक होते. अध्यक्षांनी त्याविरोधात निष्कर्ष दिल्याचे सिब्बल यांनी नमूद केले. सिब्बल यांनी अध्यक्षांच्या निष्कर्षांना थेट आव्हान देताना म्हटले की, अध्यक्षांनी दिलेले प्रमुख निष्कर्ष कायदा आणि वस्तुस्थिती या दोन्ही कसोट्यांवर टिकत नाहीत. विशेषतः दहाव्या अनुसूचीची योजना आणि रचना यांच्याशी हा निर्णय विसंगत आहे. सिब्बल यांचा शेवटचा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, शिंदे गटातील नेत्यांना आणि आमदारांना 2018 च्या पक्षघटनेनुसार झालेल्या निवडणुका, नियुक्त्या आणि पक्षाच्या रचनेचा फायदा झाला. त्याच पक्षघटनेला नंतर दुर्लक्षित करून केवळ विधिमंडळातील बहुमताच्या आधारे 'आम्हीच राजकीय पक्ष' असा दावा करता येणार नाही.

संख्याबळावर 'शिवसेना' मानता येईल का? सिब्बल यांचा मुख्य युक्तिवाद असा आहे की, दहाव्या अनुसूचीनुसार विधिमंडळ पक्षातील 'split' म्हणजेच फूट हा अपात्रतेपासून वाचण्याचा आधार राहिलेला नाही. त्यामुळे शिंदे गटातील आमदारांनी वेगळा गट केला, या आधारावर त्यांना संरक्षण मिळू शकत नाही. सिब्बल यांच्या मते, दहाव्या अनुसूचीनुसार एखाद्या आमदाराविरुद्ध 'स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडले' या कारणावरून अपात्रतेची याचिका असेल, तर 'आम्हीच तो राजकीय पक्ष आहोत' हा दावा हाच त्यांचा प्रमुख बचाव असू शकतो. एकनाथ शिंदे यांनी नेमक्या या बचावाचा वापर केला. सिब्बल यांचा महत्त्वाचा आक्षेप असा आहे की, आधी विधानसभा अध्यक्षांनी आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घ्यायला हवा होता आणि त्यानंतर निवडणूक आयोगाने कोणता गट खरा राजकीय पक्ष आहे हे ठरवायला हवे होते. शिवसेना प्रकरणात ही प्रक्रिया उलट झाल्याचा त्यांचा दावा आहे. जर एखाद्या गटातील आमदार अखेरीस अपात्र ठरले, तर त्यांची संख्या विधिमंडळातील बहुमत ठरवताना ग्राह्य धरता येणार नाही, असा सिब्बल यांचा युक्तिवाद आहे. त्यामुळे अपात्रतेचा निर्णय होण्यापूर्वीच त्या आमदारांच्या संख्येवर आधारित 'खरा पक्ष' ठरवणे चुकीचे ठरेल. सिब्बल म्हणतात की, निवडणूक आयोगाला 'खरा पक्ष कोणता?' हे ठरवण्याचा अधिकार असला तरी, ज्या आमदारांच्या संख्येवर पक्षाचा दावा आधारित आहे, त्यांची कायदेशीर स्थिती आधी निश्चित होणे आवश्यक आहे. म्हणजेच EC चा निर्णय अपात्रतेच्या निर्णयाशी जोडलेला असायला हवा. हा सिब्बल यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू आहे. आमदारांचा गट म्हणजेच संपूर्ण राजकीय पक्ष असे मानता येणार नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षात फूट पडली म्हणून राजकीय पक्षातही फूट पडली, असा निष्कर्ष काढता येणार नाही. शिंदे गटाकडे जास्त आमदार आहेत, म्हणून तोच राजकीय पक्ष आहे, हा निष्कर्ष कायद्यातील कोणत्या तत्त्वावर आधारित आहे, असा सिब्बल यांचा प्रश्न आहे.

### पक्षाच्या नेतृत्वात फूट पडली म्हणजे पक्षात फूट पडली असे नाही

सिब्बल यांनी 'leadership structure' आणि 'political party' यांच्यात फरक केला. नेतृत्वाच्या पातळीवर दोन गट निर्माण झाले म्हणून संपूर्ण नोंदणीकृत राजकीय पक्ष दोन भागांत विभागला गेला, असे कायदेशीररीत्या म्हणता येणार नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. सिब्बल यांच्या मते, अध्यक्षांनी दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेचा निर्णय घेण्याऐवजी पक्षाची अंतर्गत रचना आणि पक्षघटना यांचा सखोल तपास केला. हा अधिकारक्षेत्राचा अतिरेक असल्याचा त्यांचा आरोप आहे. सिब्बल यांच्या म्हणण्यानुसार, शिंदे गटाचे व्हिप गोगावले यांना मान्यता देणेच चुकीचे होते. कारण वैध राजकीय पक्षाच्या निर्देशानुसार नियुक्त व्हिप कोणता, हा प्रश्न आधी ठरवणे आवश्यक होते. सिब्बल यांनी सांगितले की, शिंदे गटाच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या निवडणुकीत पक्षाच्या व्हिपविरुद्ध मतदान केले. त्यामुळे त्यांच्यावर दहाव्या अनुसूचीतील अपात्रतेच्या तरतुदी लागू होऊ शकतात, असा ठाकरे गटाचा युक्तिवाद आहे. सिब्बल यांच्या युक्तिवादाचा एक भाग असा आहे की, 21 जून 2022 रोजी नियुक्त करण्यात आलेले पक्षनेते आणि व्हिप हेच वैध होते. विधानसभा अध्यक्षांनी त्याऐवजी शिंदे गटाने नियुक्त केलेल्या व्यक्तींना मान्यता देणे चुकीचे असल्याचे ते म्हणतात. सिब्बल यांनी 39 आमदारांचा संदर्भ देताना असा युक्तिवाद केला की, विधिमंडळातील बहुमताच्या आधारावर शिंदे गटाला राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व मानणे हीच अध्यक्षांच्या निर्णयातील मूलभूत चूक आहे. बहुमत असणे आणि राजकीय पक्षाची कायदेशीर ओळख असणे या स्वतंत्र बाबी आहेत.

# BHMS डॉक्टरांची नोंदणी बंद

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील बीएचएमएस डॉक्टरांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत बीएचएमएस डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी बंद ठेवण्याचा तातडीचा निर्णय राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन आणि सेंट्रल मार्ड या डॉक्टरांच्या संघटनांनी केलेल्या तीव्र विरोधानंतर सरकारने हा निर्णय जारी केला आहे. बीएचएमएस डॉक्टरांनी 3 ऑगस्टच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करण्यात यावी, यासाठी मुंबईत मोठे आंदोलन छेडले होते. मात्र, होमिओपॅथी डॉक्टरांचा MMC मध्ये समावेश करण्यास ॲलोपॅथी डॉक्टरांच्या संघटनांनी जोरदार विरोध दर्शवल्याने वैद्यकीय वर्तुळात नवा वाद निर्माण झाला होता. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये बीएचएमएस डॉक्टरांच्या नोंदणीला इंडियन मेडिकल असोसिएशन आणि मार्डने आक्रमक भूमिका घेत विरोध केला होता. यापूर्वी झालेल्या संपामुळे आरोग्य सेवेवर झालेला परिणाम लक्षात घेता, प्रशासनाने दोन्ही बाजू समजून घेऊन मध्यस्थीचा मार्ग अवलंबला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने यासंदर्भात अधिकृत पत्रक जारी करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सध्याची परिस्थिती आणि वातावरण निवळेपर्यंत, तसेच नोंदणीची योग्य कार्यपद्धती निश्चित होईपर्यंत नोंदणी थांबवणे आवश्यक आहे.

# संपादकीय

## थांबेनात उपेक्षेचे दंश

विद्यार्थ्यांनी मेहनतीने अभ्यास करून जीवनात मोठे व्हावे, यशस्वी व्हावे,' असं तत्कालीन राज्यपाल आचार्य देवव्रत काही महिन्यांपूर्वी नाशिक दौऱ्यात म्हणाले होते. पिंपरखेडच्या (ता. दिंडोरी, जि. नाशिक) आश्रमशाळेत ते मुक्कामी राहिले. आदिवासी मुलांना उपदेशाचे डोस पाजून त्यांनी प्रसारमाध्यमांचं लक्ष वेधलं. परंतु, या मुलांना किमान पोषक अन्न, पुरेशी वस्त्रं व सुरक्षित निवारा मिळाला, तरच ते शिकून मोठे होऊ शकतील आणि या मूलभूत गरजा पुरविण्याची जबाबदारी आपलीच आहे, याचं विस्मरण राज्यपाल व त्यांच्या सरकारलाही झालं. जपतलाई (जि. गडचिरोली) आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने झालेला मृत्यू हा त्याचा जिवंत पुरावा. त्याआधी काही महिन्यांपूर्वी आदिवासीमंत्री व अधिकाऱ्यांनीही यवतमाळच्या आश्रमशाळेत तोच कित्ता गिरवला. विद्यार्थ्यांसमवेत जेवण घेऊन त्यांच्याप्रतिचा कळवळा 'ऑन कॅमेरा' दाखवून दिला. परंतु, त्यांची पाठ फिरताच मागे सारं सपाट.

आदिवासी विद्यार्थी सुविधांबाबत वारंवार कमनशिबी ठरतात. त्यांना ना अंघोळीसाठी गरम पाणी मिळतं, ना मच्छरदाणी, ना पलंग! हे सरकारचं अपयश नव्हे काय? पुढारलेपणाची टिमकी मिरविणाऱ्या राज्यासाठी लाजिरवाणी बाबसुद्धा; पण सध्या ही लाज बाळगतो कोण? मग मंत्री-राज्यपालांच्या मुक्कामांचा परिपाक काय? खरं तर त्यांचे दौरे म्हणजे चमकोगिरी वा निव्वळ इव्हेंटबाजी. दर्जाहीन आहारात अळ्या, मेलेल्या पाली निघण्याची मालिका सुरूच असते. विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतणारी एखादी घटना घडली की चौकशी, अहवाल, शिफारशी, निलंबन वगैरे पार पडतं. परंतु, त्यानंतरही परिस्थितीत तसूभर फरक पडत नाही. राज्यात सरकारी आणि खासगी मिळून एक हजार पन्नास आश्रमशाळा. त्या राजकारण्यांच्याच दावणीला बांधल्या गेल्या आहेत. दोन वर्षांत या संस्थांत साडेचारशेहून अधिक लेकरांचे जीव गेले. सर्पदंश, अपघात, आजारपण ही त्याची मुख्य कारणं. विद्यार्थ्यांचे सर्वाधिक मृत्यू घरीच झाले, असा दावा आदिवासी 'विकास' विभाग करतो. परंतु, विद्यार्थी आजारी पडल्यानंतर त्याला घरी पाठविणारे महाभाग आम्हीच, हे मात्र झाकून ठेवलं जातं. यावर उपाय करण्याऐवजी त्यांना उघडं पाडणाऱ्या संघटना, पत्रकारांना आश्रमशाळांत मज्जाव करण्याचे आदेश मात्र तातडीने निघतात. गोरगरीब विद्यार्थ्यांचे बळी जाण्याच्या घटना पाहिल्या की, सामान्यांचं काळीज पिळवटतं. परंतु, निष्ठूर व्यवस्थेला पाझर फुटत नाही. फुटल्यास तो केवळ कंत्राटदार, अधिकारी आणि स्वत:च्या तुंबड्या भरण्यासाठीच.



माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर नेहमीच भर दिला. २००५ मध्ये त्यांनी इगतपुरीतील वैतागवाडीला भेट दिली. या गावाचं नाव बदलून आशाकिरणवाडी ठेवलं. परंतु, दुर्दैवाने तिथल्या विद्यार्थ्यांना आजही खस्ता खात शाळेत जावं लागतं. मुलांच्या पंखांत शिक्षणाचं बळ भरल्यास हा समाज दारिद्र्याच्या खाईतून बाहेर येईल, असा विश्वास कलाम जागवत. परंतु, सरकारी अनास्था आणि बेपर्वाई तिथंही वरचढ ठरली. कलामांच्या रूपाने आशेचा किरण उगवला खरा; पण उजेडाची ही तिरीप वैतागवाडीला उजळून टाकू शकली नाही. या काळात आदिवासींसाठी किमान बारा-पंधरा हजार कोटींच्या योजना झिरपल्या. परंतु, शाळांत साधे बेड उपलब्ध होऊ शकले नाहीत. साळुंखे समितीनेही दहा-बारा वर्षांपूर्वी त्याबाबत सांगूनही पाहिलं. परंतु, उपयोग झाला नाही. आता कदाचित बेड मिळतीलही; परंतु ते तकलादू असतील. कारण हजारो कोटींच्या भ्रष्टाचाराचा दंश त्यांना झालेला असेल. रिवाजाप्रमाणे चौकशीसाठी बसलेल्या समितीच्या शिफारशींची झाकाझाकही आपसूक होईलच. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न केवळ आश्रमशाळा वा शिष्यवृत्तीपुरते खचितच मर्यादित नाहीत; ते त्यांची सुरक्षितता, सन्मान आणि भविष्याशी निगडित आहेत, हे कोणी लक्षात घ्यायला तयार नाही. आणि हेच अधिक दुर्दैवी आहे.

## संस्कृत सुभाषित

न गृहं गृहामित्या दुर्गुहिणी गृहमुच्यते ।

अर्थ : घर म्हणजे गृहिणी, तिच्याशिवाय घर हे घर नव्हे तर ते अरण्य, पत्नी केवळ पत्नीच नसते. तिचे स्थान फार मोठे आहे. पतीच्या कुटुंबाच्या, सर्वांच्या जीवनात ती सर्वांना संतुष्ट करणारी देवताच असते.

## गुरु वचन

### मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

## उपदेशकथा

### चुका काढणे सोपे!

बादशहाच्या दरबारात एक चित्रकार आला व त्याने एक सुंदर चित्र काढले. बादशहास फार आनंद झाला. आता त्याला मोठे बक्षीस मिळणार हे पाहून दरबारातील इतर मंडळी जळफळली. अशाच एकाने सुचवले की, हे चित्र मुख्य चौकात लावावे आणि सर्वसामान्यांची प्रतिक्रिया अजमावावी. हे कसं करावं? असं बादशहाने विचारताच उत्तर आलं की, चित्रात जिथे चूक आढळेल तिथे प्रजेने फुली मारावी, असं जाहीर झाल्यावर ज्याने त्याने येऊन चित्रावर जागोजाग फुल्या मारल्या. चित्रकार नाराज झाला. तो अखेर बिरबलाकडे आला. बिरबलाने सुचविले की, त्याने असेच दुसरे चित्र काढावे. चौकात लावावे व खाली लिहावे, जो कोणी असे हुबेहुब चित्र काढू शकेल त्यानेच फुली मारावी. यावेळी मात्र एकही फुली पडली नाही.

कथा उपदेश : पात्रता नसताना दुसऱ्याच्या चुका काढणं खूप सोपं असतं, स्वत:त बदल घडवणं खूप अवघड!

## पंचांग

| | |
|---|---|
| १९ ऑगस्ट २०२६ | योग:ब्रह्म २७:४३:१४+ |
| बुधवार | करण:गर ०६:३०:५८ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:वणिज १९:१९:४५ |
| श्रावण शके | सूर्य:सिंह |
| संवत्- १९४८ | चन्द्र:तुला |
| संवत्सर - पराभवनाम | हिजरी सन् - १४४८ |
| अयन- दक्षिणयन | मुस्लिम मास - रबिलावल |
| मास- श्रावण | तारीख - ५ |
| ऋतु- सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | सीतला सप्तमी |
| तिथि:सप्तमी १९:१९:४५ | बुधपूजन |
| नक्षत्र:स्वाती ०६:४६:२९ | गोस्वामी तुलसीदास जयंती |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | | 4 | | | |
| 8 | | 3 | 1 | | | | 4 | |
| 5 | | | 7 | | | | | |
| | 1 | | | | 3 | 9 | 5 | |
| | | 5 | 6 | 9 | 1 | 7 | | |
| | 9 | 8 | 4 | | | | 3 | |
| | | | | | 2 | | | 5 |
| | 7 | | | | 5 | 1 | | 2 |
| | | | 3 | | | | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 5 | 3 | 2 | 4 | 7 | 1 | 9 | 8 |
| 4 | 7 | 9 | 5 | 8 | 1 | 3 | 6 | 2 |
| 8 | 1 | 2 | 3 | 9 | 6 | 7 | 5 | 4 |
| 5 | 9 | 4 | 1 | 3 | 8 | 6 | 2 | 7 |
| 1 | 3 | 6 | 7 | 2 | 4 | 5 | 8 | 9 |
| 7 | 2 | 8 | 9 | 6 | 5 | 4 | 3 | 1 |
| 3 | 8 | 5 | 4 | 7 | 9 | 2 | 1 | 6 |
| 2 | 6 | 7 | 8 | 1 | 3 | 9 | 4 | 5 |
| 9 | 4 | 1 | 6 | 5 | 2 | 8 | 7 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६० – रशियाने अंतराळयानामध्ये लायका ही कुत्री प्रयोगासाठी पाठवून सजीव प्राणी अंतराळात पाठविण्याचा पहिला प्रयोग केला.
- २००६ – भारताचे रेहान पोंचा आणि रोहित हवलदारने कोलंबोत दहाव्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ४०० मीटर फ्री स्टाईल जलतरणात क्रमश: सुवर्ण आणि रौप्य पदक जिंकले तर व्ही. तेजस्वनीने महिलांच्या १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक पोहण्याच्या स्पर्धेत रौप्य पदक मिळवले.

### राष्ट्रीय

- १९७६ – आंध्रप्रदेशामध्ये नागार्जुनसागर विद्यापीठाची स्थापना.
- २००८ – जयपूरचे रहिवाशी हबीबमियाँ यांचे निधन झाले. ते १३९ वर्षांचे होते. जयपूर शहरातील सर्वात वयोवृद्ध व्यक्ती म्हणून २००५ साली लिम्का बुकमध्ये त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती.

### जन्म

- १८७८ – मॅनुअल क्युझन, फिलीपीन्सचे राष्ट्राध्यक्ष.
- १८८३ – जोस मेंडेस कॅबेकॅड्स, पोर्तगालचे ९५वे पंतप्रधान व ९ वे राष्ट्राध्यक्ष.
- १९७३ – मार्को मॅटेरेझी, इटलीचा फुटबॉलपटू.
- १९८७ – इलिना डीक्रझ, तेलगु चित्रपट अभिनेत्री.

### निधन

- १९३६ – मादाम कामा, आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचा तिरंगा झेंडा प्रथमच फडकविणाऱ्या.
- १९४७ – मास्टर विनायक उर्फ विनायक दामोदर कर्नाटकी, जुन्या काळातील ज्येष्ठ दिग्दर्शक अभिनेते.
- १९९० – रा. के. लेले,ज्येष्ठ पत्रकार व मराठी वृत्तपत्र इतिहासाचे लेखक यांचे.

## : SMS :

Friend 1: Bhai 149 me 5 items aa gaye!
Friend 2: Haan... 1 pizza, 1 garlic bread, 1 pepsi, 1 parcel, 1 lava cake... aur 5th item hai "khali pet"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.२ | २४.१ |
| अहमदनगर | २९.३ | २१.८ |
| अकोला | ३५.२ | २४.५ |
| अमरावती | ३४.५ | २४.३ |
| बीड | ३७.४ | २४.९ |
| भंडारा | ३३.४ | २५.२ |
| बुलढाणा | ४४.४ | २६.९ |
| चंद्रपूर | ३६.५ | २५.५ |
| चेन्नई | ४१.७ | ३१.२ |
| नवी दिल्ली | ४२.८ | ३३.८ |
| धुळे | ३२.८ | २४.९ |
| गोंदिया | ३१.९ | २५.१ |
| जळगाव | ३५.३ | २३.९ |
| कोल्हापूर | २७.१ | २१.३ |
| लातूर | ३१.७ | २२.६ |
| मुंबई | ३२.७ | ३०.८ |
| नागपूर | ३४.३ | २४.३ |
| नांदेड | ३४.५ | २४.१ |
| नंदूरबार | २६.७ | २४.६ |
| नाशिक | २५.७ | २२ |
| पुणे | २४.३ | २२ |
| पंढरपूर | ३२.७ | २४.२ |
| सातारा | २८.५ | २०.२ |
| सांगली | ३०.४ | २२.१ |
| सोलापूर | ३२.९ | २४.२ |
| वर्धा | ३५.१ | २४.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा :दक्षिण प्रसन्नतेमुळे आपल्या कामाचे सार्थक होईल. भेटवस्तू मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम पराक्रमामुळे आपल्याला यश मिळेल. स्तुतीपासून दूर रहा.

**वृषभ :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा:पूर्व कौटुंबिक जीवन आनंददायी राहील. पूर्वी केलेल्या कामाचे परिणाम चांगले दिसून येण्यास सुरूवात होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम रोजगारात परिवर्तन होण्याची शक्यता आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व विनयशिल राहून प्रत्येक कामात यश मिळणार आहे. आकर्षक प्रस्ताव मिळतील फायदा घ्या.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा :पूर्व कौटुंबिक समस्या निर्माण होतील. देण्या-घेण्याच्या व्यवहारात काळजी बाळगा. व्यापार मध्यम राहील.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर गृहपयोगी वस्तू खरेदी कराल. दूरदर्शीपणा ठेवून कार्य करा. व्यापारातील हेतु साध्य होतील.

**मकर :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा:पश्चिम स्वत:ची योग्यता समजून घेतली तरच आपण समाजात प्रतिष्ठा संपादन करू शकाल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम आधिकारी वर्ग आपल्या कामाची स्तुती करतील. बौद्धीक पातळीत वाढ होईल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम साहस पराक्रमात वाढ होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. थंडीचे आजार जाणवतील.

**कन्या :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण अडचणींचा सामना करून आपण आपले ध्येय साध्य करू शकता. व्यापार फायदेशीर राहण्याचा योग आहे.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर दिवस चांगला जाणार असला तरी आर्थिक तंगी राहणार आहे. मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४४



### आडवे शब्द

१. गुन्हा
५. करमणूक करणारे
८. सडपातळ
११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी!
१२. गुजराथी नृत्य प्रकार
१४. वर्तुळ
१६. भरभराट
१९. मुरली, बासरी
२०. धोबी
२१. सैन्यातील एक हुद्दा
२३. घागरा
२४. बर्फाचा पर्वत
२५. अभय देणे
२७. श्रीमंत
२८. वहिवाट, शेत
२९. संपणे
३०. चुकीचे
३१. करार, भिस्त
३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी
३५. स्वच्छ
३७. घर
३९. विपत्तीची कहाणी
४१. कणसातील दाणे
४३. सज्जनगडचे संत
४४. सार, अर्थ
४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी
४६. वर-वधू
४८. सरहद्द
४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला
५३. युद्ध
५५. लहान
५६. वेल
५८. जादू, भ्रम
५९. बाळाची बोलगाणी
६३. अतिशय हाल
६५. पावसाची झड
६६. राज्यघटना (हिंदी)
६७. गेरु
६८. पडते घेणे
७०. माया, प्रेम
७१. विविध
७३. संध्याकाळ
७४. हनुमान
७५. झकास, सुंदर
७६. राजकारणी यात्रा!
७७. रड्या माणूस
७८. मौल्यवान साठा

### उभे शब्द

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत
२. राजाचा कालावधी
३. मोठ्ठीच गंमत
४. ऐट, दिमाख
५. वर्ण
६. सोन्याचा धागा
७. '--- में हड्डी'
८. रस्ता, पर्थ
९. जिवलग मित्र
१०. समशेर
१३. लोकांचा समूह
१५. नवरा
१७. रत्न
१८. सूर्य, तापविणारा
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. सामान
२४. थंडीचे दिवस
२५. प्राण
२६. आशीर्वाद
२७. सावकार, श्रीमंत
२८. उत्तराधिकारी
२९. शाब्दिक हजामत
३२. दरवाजा
३३. हालचाल
३४. खरकट्याची रास
३६. पळून गेलेला
३८. हिंदीत दहा
४०. ओटा
४२. कर्ण
४४. तमाशा कलाकार
४७. उगाच भटकणे
४९. हस्त
५०. सर्वस्व
५१. भोळा (शंकर)
५२. लोखंडी वस्तूवरील गंज
५४. अभिप्राय
५७. चंद्र
५८. ममता, प्रेम
६०. डोंगर उतरण, ढाळ
६१. डासाचे चावणे
६२. गीत
६४. मिठी
६६. अनुमती, मान्यता
६८. टक, दृष्टी
६९. सहाय्य
७०. वारा
७१. बाई, स्त्री
७२. श्वान
७४. मुलांच्या भाषेत मांजर
७५. सिंहाचे पिल्लू

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.नजर ३.हजरजबाबी ८.कडकडाट ११.मधुकर १२.नयनबाण १३.रावण १४.नातलग १५.कलेवर १७.भाकर १८.काढीव १९.रवा २१.विनाशिका २२.लीन २४.नासा २६.कसोटी सामना ३०.रस ३२.परका ३३.लबाडी ३४.महाराज ३५.अतिशय ३७.बारमाह ३९.करवत ४१.रत्नहार ४३.कपास ४६.खडा ४७.नल ५०.राम ५२.वारसदार ५४.रजनीश ५५.शीतल ५७.रज ५८.जळमट ६०.दमा ६१.वानवा ६२.ईश ६३.फस्त ६५.सुमन ६७.पावन ६९.कळवाकळवी ७१.गपगार ७३.लस ७४.पाटील ७६.जनन ७७.दरी ७८.डाका ७९.मनगटी

उभे उत्तर : १.नवरात्र २.रमण ३.हकनाक ४.जरतर ५.जनगणना ६.बाय ७.बीन ८.कणकवली ९.कडेवर १०.टन १६.रवाना १७.भामटी १८.काका २०.वाकडा २१अ.शीतलहर २३.नरम २५.सावज २७.साप २८.मरवा २९.खोडी ३१.सहायक ३३.प्रहार ३६.शर ३६अ.यवन ३८.खार ४०.तलवार ४२.हावरट ४४.पारा ४५.समसमान ४६.खलाशी ४८.अंदाज ४९.मनीषा ५१.लालनपालन ५२अ.रजई ५३.रळफळ ५६.तवा ५९.मस्तवाल ६०.दमदाटी ६१अ.वाव ६४.ओळ ६६.काळीज ६८.नगद ६९.करडा ७०.कसम ७२.परी ७४.पाटी ७५.लक्ष्य

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे

### वडील रोजंदारी मजूर, आई आशा वर्कर लेकीने इतिहास घडवला..!

**पुणे : दैनिक संध्या**



अतिशय सामान्य कुटुंबात जन्म... घरची स्थिती अत्यंत बेताची. वडील रोजंदारी मजूर अन् आई आशा वर्कर... या आव्हानांवर मात करत जिद्दीच्या जोरावर वैष्णवी भोसले हिने राज्य लोकसेवा आयोगाच्या अर्थात एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून इतरांपुढे आदर्श निर्माण केला आहे. यात वैष्णवीची राज्य कर निरीक्षक व "दुय्यम निबंधक (श्रेणी-१) या दोन्ही पदांसाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, वैष्णवीने एससी प्रवर्गातून राज्यात मुलींमध्ये दोन्ही पदांसाठी प्रथम क्रमांक मिळवला आहे. मुळची धाराशिव येथील रहिवासी असलेल्या वैष्णवीने दीपस्तंभ फाउंडेशन-मनोबल प्रकल्पातील पुणे केंद्रातून राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचे धडे गिरविले. वैष्णवीने एमपीएससी गट-ब संयुक्त परीक्षेत मिळवलेल्या यशामुळे मनोबलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तिने मिळवलेले हे यश उल्लेखनीय आहे. दीपस्तंभ मनोबल प्रकल्पाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या वंचित, दिव्यांग, अनाथ आणि समाजातील विविध दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी निवासी प्रशिक्षण, अभ्यासाचे पोषक वातावरण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या संधीचा उपयोग करत विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत आपले स्थान निर्माण केले आहे. याबद्दल दीपस्तंभ फाउंडेशन-मनोबलचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन म्हणाले की, संधीची समानता आणि सर्वसमावेशक शिक्षण ही केवळ संकल्पना न राहता प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्यक्ष संधी मिळणे गरजेचे आहे. परिस्थिती, सामाजिक किंवा आर्थिक पार्श्वभूमी कोणतीही असो, योग्य मार्गदर्शन व समान संधी मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी आपल्या क्षमतेच्या बळावर यशाची उंची गाठू शकतो. दीपस्तंभ मनोबलच्या विद्यार्थ्यांचे हे यश त्याच समावेशक शिक्षणाच्या विचाराचे सार्थक उदाहरण आहे.

### बांधकाम व्यावसायिकाला ५ कोटींच्या खंडणीसाठी धमकी

**पुणे : दैनिक संध्या**

बांधकाम व्यावसायिकाच्या कुटुंबीयांची सर्व माहिती घेऊन त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन ५ कोटी रुपये खंडणी मागण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विमाननगर येथील ५० वर्षीय बांधकाम व्यावसायिकाने खंडणी विरोधी पथकाकडे फिर्याद दिली आहे. विमानतळ पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या बांधकाम व्यावसायिकाची फोन करणाऱ्यांनी सर्व माहिती घेऊन रेकी केली असल्याचे त्याच्या बोलण्यावरून दिसून येत आहे. १२ ते १४ ऑगस्ट दरम्यान सातत्याने या बांधकाम व्यावसायिकाला फोन येत होते. सर्व प्रथम १२ ऑगस्ट रोजी त्यांना रात्रीच्या वेळी फोन आला होता. अनोळखी नंबरवरून व्हॉट्सअॅप कॉल असल्याने त्यांनी तो उचलला नाही. १३ ऑगस्ट रोजी पुन्हा रात्री कॉल आले. त्यांनी उचलले नाही. नंतर त्याने साधा कॉल केला, परंतु तिकडून काही आवाज नीट ऐकू येत नव्हता. म्हणून त्यांनी फोन कट केला. नंतर आलेला कॉल त्यांनी घेतला. तेव्हा तो म्हणाला, 'मै टायसन, राजस्थान से, रंगदारी के लिए कॉल किया है' तेव्हा त्यांना वाटले की कोणीतरी रंगकाम मागण्यासाठी कॉल केला असेल, असे वाटून त्यांनी त्या कॉलकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर १४ ऑगस्ट रोजी पहाटे २ वाजता त्यांना व्हॉट्सअॅप कॉल आला. तो म्हणाला, 'मै टायसन बिष्णोई बात कर रहा हू, आपने बोहोत मोटा कारोबार करा है, जो काम कर रहे हो वो ऐसे ही करते रहो तो आप को ५ करोड रुपये देना पडेगा,' असे म्हणत कुटुंबीयांची नावे सांगत धमकी दिली. बांधकाम व्यावसायिकाची मुलगी, भाऊ, बहीण त्यांचा परिवार हे काय काय काम करतात, कोठे असतात, याची माहिती दिली. जर तुम्हाला शंका असेल तर तुम्ही ब्लॉक करू शकता. जेव्हा परिवारातील एखाद्या मेंबरला गोळी लागली की तुम्हाला माझी गोष्ट लक्षात येईल. तेव्हा ५ च्या जागी १५ किंवा २० कोटी रुपये द्यावे लागतील, अशी धमकी दिली. उद्या पुन्हा याच वेळी फोन करेल, फोन घेतला नाही तर तुमचे नुकसान होईल, तुमच्या पार्टनरशी बोलून ठरवा. त्यानंतर त्यांना दुसऱ्या दिवशी अनेक फोन आले. परंतु, त्यांनी घाबरून फोन घेतले नाही. तेव्हा त्याने टेक्स्ट मेसेज केला. त्यात त्यांच्या पार्टनरची मुले काय करतात, याची माहिती दिली होती. त्यानंतर फोन करणाऱ्याने त्यांच्या पार्टनरला टेक्स्ट मेसेज केला. त्यात 'अगर आप अपने परिवार के जीवन का सही मूल्य समझते है, तो अपने भाई से बात किजिए, धीरे धीरे यह संदेश परिवार के सभी सदस्यों तक पहुंच जाएगा और फिर गोलिया चलेंगी टायसन बिष्णोई' असा मेसेज केला आहे. या प्रकारामुळे या बांधकाम व्यावसायिकाने पोलिसांकडे धाव घेतली. विमानतळ पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दिलीप पालवे करत आहेत.

### राजकीय नेतृत्वाने प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सुसंवाद ठेवावा : शरद पवार

**पुणे : दैनिक संध्या**

महाराष्ट्राच्या विकासात सक्षम प्रशासकीय यंत्रणेचा मोठा वाटा आहे. राज्यातील प्रशासनाची देशभरात चांगली प्रतिमा असून, हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सोमवारी (दि.१७) केले. माजी सनदी अधिकारी शिवाजीराव देशमुख यांच्या 'आठवणींची ओंजळ' या पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि शरद पवार यांच्या हस्ते यशदा येथे झाले. त्यावेळी पवार बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी मंत्री शशिकांत सुतार, माजी मुख्य सचिव अजित निंबाळकर, सुमित मलिक, नितीन करीर, यशदाचे महासंचालक सुहास दिवसे आणि शिवाजीराव देशमुख उपस्थित होते. "राजकीय नेतृत्वाकडे प्रत्येक विषयाचे संपूर्ण ज्ञान असेलच असे नाही. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सुसंवाद ठेवावा. प्रशासनाचा अनुभव आणि ज्ञान लोकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वापरले पाहिजे", असे त्यांनी स्पष्ट केले. पवार म्हणाले, "मी संरक्षणमंत्री झालो तेव्हा लेफ्टनंट मोठा की कर्नल मोठा हेही माहीत नव्हते. रँक माहिती नव्हत्या. त्यानंतर कोल्हापूरला जाऊन जनरल थोरात यांच्याकडून तीन दिवस लष्कराची रचना आणि सीमेवरील प्रश्न समजून घेतले." यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी आभार मानले. प्रशासनातील कामाचे मूल्यमापन होण्याची गरज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. सरकार आर्थिक ताळेबंद मांडते; मात्र प्रत्यक्ष कामाचेही मूल्यमापन झाले पाहिजे. प्रशासनात पारदर्शकता, निर्णय घेण्याचे धाडस आणि लोकाभिमुखता आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### कष्टकरी कुटुंबातील युवकाचे स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश

**पुणे : दैनिक संध्या**

आलेगाव पागा (ता. शिरूर) येथील सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबातील विकास सोपान अवचिते यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) वतीने सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत राज्य कर निरीक्षक पदावर निवड झाली आहे. कोणत्याही मोठ्या सुविधा अथवा विशेष मार्गदर्शनाचा आधार नसतानाही जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल आलेगाव पागा परिसरातून अवचिते यांचे अभिनंदन होत आहे. विकास अवचिते यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आलेगाव पागा येथे झाले. त्यानंतर त्यांनी न्हावरे येथील श्री. मल्लिकार्जुन माध्यमिक विद्यालयात बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे पुणे येथील वाडिया महाविद्यालयातून कला शाखेची पदवी सन २०१६ मध्ये पूर्ण केली. पदवीचे शिक्षण घेत असतानाच विकास यांना स्पर्धा परीक्षांची गोडी निर्माण झाली. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून आलेल्या विकास यांच्यासमोर आर्थिक अडचणींसह अनेक आव्हाने होती. मात्र, या अडचणींना खचून न जाता त्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्याचा ध्यास घेतला.

# सुराज्य करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची

## राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन ; राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा पुणे विभाग पारितोषिक वितरण

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव आणि पुणे हे संस्कृती, परंपरा व सामाजिक एकतेचे नाते आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाकडे देशाचे लक्ष असते. पूर्वी लाऊड स्पीकरवर बंधने नव्हती, आता उच्च न्यायालयाने सर्वांचा विचार करून मर्यादा आखून दिल्या आहेत. त्यामुळे लाऊडस्पिकर, शाडू माती वापर, पर्यावरण संवर्धन याकडे लक्ष देत उत्सवाला चांगले स्वरूप यायला हवे. आपल्याला स्वराज्य मिळाले व त्याचे रूपांतर सुराज्यात कसे होईल, याकडे लक्ष द्यायचे आहे. सुराज्य करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे मत राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केले.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा पुणे शहर महापालिका क्षेत्र विभाग पारितोषिक वितरण समारंभ गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, सहा पोलीस आयुक्त संजय दराडे, ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार, परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, तुषार रायकर, राजाभाऊ पायमोडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

भोसले मार्ग भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने सलग दुस-या वर्षी प्रथम क्रमांक पटकाविला. तर, हडपसरमधील नवरंग मित्र मंडळ ट्रस्टने द्वितीय, अरण्येश्वर तावरे कॉलनीतील एकता मित्र मंडळ ट्रस्टने तृतीय, एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने चौथे तर नारायण पेठेतील संयुक्त प्रसाद मित्र मंडळाने पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

गिरीश महाजन म्हणाले, आपण अनेक उत्सव साजरे करतो, त्यात डीजे लावले जातात, तरुणांमध्ये ड्रग्ज सेवनाचे प्रमाण वाढत आहे. तरुणाई भरकटत आहे की काय? असे आज वाटत असताना यापासून दूर राहून तरुणाईने प्रत्येक उत्सव चांगला होईल, याकडे लक्ष द्यायला हवे. उत्सवातील लाऊडस्पीकर ची बंधने पोलीस ठरवत नाहीत, ती सर्वोच्च न्यायालय ठरवते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा विचार होत उत्सव साजरा होणे आवश्यक आहे, असे सांगत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट तर्फे सुरु असलेल्या वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

आमदार हेमंत रासने म्हणाले, उत्सवाला चांगली दिशा देण्याचे काम श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या माध्यमातून सुरु आहे. पोलिसांनी उत्सवाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा. नुसते दरडावून चालणार नाही, तर प्रत्येकाला सोबत घेऊन आपल्याला जावे लागेल. विसर्जन मिरवणूक किती वेळात संपणार याविषयी सुरुवातीला मिटिंग मध्ये चर्चा होते. हा केवळ मिरवणुकीचा उत्सव नसून दहा दिवसांसाठी आहे. धर्म, संस्कृती, परंपरा टिकली पाहिजे, याकरिता उत्सव आहे. त्यामुळे उत्सवात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला त्रास देऊ नका, असे आवाहन यांनी पोलिसांना केले.

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, गणेश मंडळांना अनेकदा अभय देण्याचे काम आम्ही करतो. मात्र आता शिस्त लागणे देखील गरजेचे आहे. आपल्या पुण्याच्या गणेशोत्सव जगभरात प्रसिद्ध आहे. त्याला कलंक लागू नये, म्हणून आपण सगळे झटत असतो. गणेश मंडळे ही सामाजिक कार्य करणारी केंद्र झाली असून ढोल ताशा पथकातील तरुण मंडळी देखील चांगले काम करीत आहेत. मात्र, संस्कृतीचा आनंद घेताना इतरांच्या हक्काची देखील आपण काळजी घ्यायला हवी.

डीजे नाकारून पारंपरिक वाद्य वादन व्हावे. आवाजाची पातळी कमी ठेवून सुरक्षित आणि आनंददायी उत्सव करूया. संजय दराडे म्हणाले, पुण्याचा गणेशोत्सव म्हटला की श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती आणि आजूबाजूच्या परिसरात देशभरातून लोक येतात. त्यामुळे मंडळांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही, स्वयंसेवक, महिला-पुरुष स्वतंत्र रांग अशी व्यवस्था असावी.

तसेच हे मुद्दे दगडूशेठ गणपती ट्रस्ट घेत असलेल्या स्पर्धेत देखील असावे. उत्साह, श्रद्धा आणि परंपरेप्रमाणे यंदाचा उत्सव साजरा करूया, असेही त्यांनी सांगितले. महेश सूर्यवंशी म्हणाले, कार्यकर्त्यांच्या उर्जेला सकारात्मक वळण लागावे, यासाठी ४० वर्षांपूर्वी ही स्पर्धा सुरु झाली. गणेशोत्सवात आणि वर्षभर देखील मंडळाकडे असलेला निधी मानवसेवा आणि प्रबोधनासाठी वापरला जात आहे, हे या स्पर्धेचे फलित आहे.

## वाघमारे यांना महर्षि वेदव्यास राष्ट्रीय गुरु गौरव पुरस्कार प्रदान

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय, समर्पित आणि प्रेरणादायी योगदानाबद्दल डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीच्या डॉ. डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, पिंपरी येथील समाजशास्त्र विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्वरूप ए. वाघमारे यांना नुकताच 'महर्षि वेदव्यास राष्ट्रीय गुरु गौरव पुरस्कार २०२६-२७' प्रदान करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त १६ ऑगस्ट रोजी नंदुरबार येथे आयोजित विशेष पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला.




नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरमच्या वतीने देण्यात आलेल्या या पुरस्कारासाठी देशभरातून १७८ नामांकने प्राप्त झाली होती. त्यापैकी शिक्षण, वैद्यकीय क्षेत्र आणि सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाच्या आधारे ७५ मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये स्वरूप वाघमारे यांचा समावेश आहे.

या पुरस्कार सोहळ्यास डॉ. कविता साळुंके, श्री. विशाल गावीत, डॉ. चुतर पी. सावंत, श्री. गोरख देवरे, डॉ. राकेश अशोक रामराजे आणि श्री. सारांश शेड भावसार हे प्रमुख अतिथी उपस्थित होते. ज्ञानाचा प्रसार, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत शिक्षणाच्या माध्यमातून दिलेल्या योगदानाची दखल घेत स्वरूप वाघमारे यांना हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.

## परिस्थिती कोणतीही असो, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत

■ पुणे (दै. संध्या)

मी देखील पहिली ते चौथीपर्यंत महापालिकेच्या शाळेतून शिक्षण घेतले असून, आज तुमच्या शहराचा सहपोलीस आयुक्त म्हणून उभा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परिस्थिती कोणतीही असो, मोठी स्वप्ने पाहावीत, त्यासाठी मेहनत घ्यावी आणि आई-वडील तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन व म्हणणे ऐकावे. प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास कोणत्याही परिस्थितीतून यशस्वी होता येते, असे मत पुण्याचे सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांनी व्यक्त केले.

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टतर्फे मंडईतील बुरुड आळी येथे म्हसोबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये सुमारे १ हजार गरजू विद्यार्थ्यांना एकूण २ लाख ५१ हजार रुपयांच्या वह्या व शालेय साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ व्यावसायिक रमणशेठ लुंकड, अभिनेत्री ऐश्वर्या नारकर, पेशवाई क्रिएशनचे अमोल येमुल, ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव आदी उपस्थित होते. शुक्रवार पेठेतील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यानिकेतन शाळा क्र. १, समर्थ प्रतिष्ठान, सौ. सुशीलाबाई विरकर हायस्कूल संस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांतर्गत ६ हजार वह्या आणि १ हजार रायटिंग पॅडचे वाटप करण्यात आले.

## विकासाच्या नावाखाली होणारा निसर्गाचा विनाश थांबला पाहिजे

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहरात डोंगरतोडीचे पाप वाढले आहे; विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखला जाणे गरजेचे आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली होणारा निसर्गाचा विनाश थांबला पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा, खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. बारामती लोकसभा मतदारसंघातील खडकवासला परिसरातील विविध प्रश्नांसाठी खा. सुळे यांनी सोमवारी पुणे महानगरपालिका आयुक्तांची भेट घेतली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बालभारती-पौड रस्ता प्रकल्पावर बोलताना खा. सुळे म्हणाल्या, विकासाला आमचा विरोध नाही. पण विकासासाठी पर्यावरणाची किंमत मोजावी लागू नये. टेकड्या कापल्या गेल्या तर आम्ही राजकीय पक्ष म्हणून नव्हे, तर पुणेकर म्हणून रस्त्यावर उतरून विरोध करू.


## डॉ. प्रभा अत्रे संगीत साहित्य-संशोधन पुरस्कार जाहीर

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-साहित्य पुरस्कार आणि स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-संशोधन पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पुरस्कारांची घोषणा ज्येष्ठ गायक, गुरू डॉ. विकास कशाळकर, संगीत अभ्यासक डॉ. केशवचैतन्य कुंटे, डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी., कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी केली. पुरस्कारांचे यंदाचे पहिले वर्ष आहे.


अंजली मालकर


माधवी नानल


शमा भाटे


डॉ. अर्पिता वैशंपायन


डॉ. पल्लवी पोटे


डॉ. निरजा उदय वाघ.

किराणा घराण्याच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या ज्येष्ठ गायिका, विचारवंत, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, लेखिका, संगीतकार आणि गुरू स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे या पुण्याच्या अभिमानास्पद व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी संगीताच्या विविध पैलूंवर तसेच वर्तमानकाळातील सादरीकरणाशी संबंधित विषयांवर अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली आहेत. संगीत या एकाच विषयावर एकाच वेळी ११ पुस्तकांचे प्रकाशन करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर आहे.

डॉ. प्रभाताई अत्रे असे सांगत की, "संगीत ही सादरीकरणाची कला आहे आणि सादरीकरणाला नेहमीच प्राधान्य असते. काळानुरूप होणाऱ्या बदलांचे दस्तऐवजीकरण करणारे शास्त्रही त्यानुसार विकसित होणे आवश्यक आहे. आज भारतीय संगीताला जागतिक स्तरावर मिळत असलेला विस्तार पाहता हे अधिकच महत्त्वाचे ठरते."

डॉ. प्रभाताई अत्रे यांचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि संगीत क्षेत्रातील संशोधन व दस्तऐवजीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे या वर्षीपासून 'स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-साहित्य पुरस्कार' आणि 'स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-संशोधन पुरस्कार' देण्यात येणार आहेत.

संगीत साहित्य पुरस्कार : प्रथम : रुपये २५ हजार : 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' (मराठी) – प्रा. अंजली मालकर. द्वितीय : रुपये २० हजार : 'संग्राम संगीतकारांचा' (मराठी) - माधवी नानल.

तृतीय : रुपये १५ हजार : 'नृत्यमय जग नर्तनाचा धर्म' (मराठी) - विदुषी शमा भाटे.


संगीत-संशोधन पुरस्कार : प्रथम : रुपये २० हजार : 'छोटा गंधर्व - ॲन एपिटोम ऑफ क्रिएटीव्हिटी इन इंडियन म्युझिक' (इंग्रजी) - डॉ. अर्पिता वैशंपायन द्वितीय पुरस्कार : रु. १५ हजार : 'संगीत भूषण पंडित राम मराठे यांच्या गायकीतील जोड राग' (मराठी) - डॉ. पल्लवी पोटे. तृतीय पुरस्कार : रु. १० हजार : 'उत्तर हिंदुस्थानी संगीत में स्वरलिपि पद्धति की भूमिका एवं विकास – चिकित्सक अभ्यास' (हिंदी): डॉ. निरजा उदय वाघ. या पुरस्कारांसाठी परीक्षक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विकास कशाळकर होते. परीक्षक मंडळामध्ये डॉ. केशवचैतन्य कुंटे, डॉ. अंजली दाणी, डॉ. अश्विनी वळसंगकर, डॉ. चेतना पाठक आणि डॉ. अतिंद्र सरवडीकर यांचा समावेश होता.

# आयटीएलकडून २५ एकरवर कृषी नवोन्मेष केंद्राच्या रूपाने जागतिक संशोधन

■ पुणे (दै. संध्या)

भारताचा क्रमांक एकचा निर्यात ब्रँड आणि 'सोनालिका ट्रॅक्टर्स' या फ्लॅगशिप ब्रँडची मालकी असलेली इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल) उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे 25 एकर जागेवर नवीन ग्लोबल रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर स्थापन करण्यासाठी सज्ज झाली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आयटीएल व्यवस्थापनासोबत लखनौ येथे झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला. भविष्यासाठी सज्ज तंत्रज्ञान आणि शेतकरी केंद्रित नवकल्पना विकसित करण्यासाठी जागतिक प्रगत अभियांत्रिकी केंद्र म्हणून आयटीएलच्या या प्रस्तावित जागतिक संशोधन आणि विकास केंद्राची संकल्पना मांडण्यात आली आहे.

ही नवीन ग्रीनफिल्ड सुविधा आयटीएलच्या 'जीतने का दम'च्या माध्यमातून शेतीत बदल घडवून आणण्याच्या तीन दशकांच्या प्रवासातील नैसर्गिक प्रगतीचे प्रतिनिधित्व करते. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्णतेच्या पुढील टप्प्यासाठी आयटीएलची दूरदृष्टी आणि तंत्रज्ञान-प्रधान औद्योगिक गुंतवणुकीचे स्थान म्हणून उत्तर प्रदेशच्या वाढत्या भूमिकेशी हा ब्रँड कसा सुसंगत आहे, यावर या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. ही नवीन सुविधा एक शक्तिशाली परिसंस्था तयार करण्याच्या आयटीएलच्या क्षमतेला आणखी बळकट करेल. यामध्ये भारतीय आणि जागतिक बाजारपेठेच्या गरजेनुसार कृषी उत्पादने विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या प्रतिसादासह अभियांत्रिकी कौशल्याची सांगड घालण्यात येईल.



हे नवीन केंद्र उच्च-मूल्य अभियांत्रिकी, कौशल्य विकास, रोजगार निर्मिती आणि तंत्रज्ञानाच्या नेतृत्वाखालील औद्योगिक प्रगतीद्वारे राज्याच्या व्यापक नावीन्यपूर्ण परिसंस्थेत योगदान देईल, अशीही अपेक्षा आहे. राज्यासाठी कंपनीच्या दीर्घकालीन नावीन्यपूर्णतेच्या रोडमॅपमध्ये हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, " उत्तर प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना भेटून उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे आयटीएलच्या नवीन २५ एकर जागतिक संशोधन आणि विकास केंद्रासाठी आमची संकल्पना सादर करणे, ही एक सन्मानाची बाब आहे. आयटीएलमधील आमच्यासाठी कृषी नवनिर्मितीच्या पुढील आघाडीला आकार देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. व्यवसाय जगताच्या भरभराटीला आधार देणाऱ्या त्यांच्या प्रोत्साहन, आत्मविश्वास आणि प्रेरणादायक नेतृत्वाबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभारी आहोत. प्रगतिशील, तंत्रज्ञान-प्रधान उत्तर प्रदेशसाठी त्यांची निर्णायक दूरदृष्टी आम्हाला मोठा विचार करण्यास, वेगाने पुढे जाण्यास आणि भविष्यासाठी बांधकाम करण्यास प्रेरित करते.

कृषी संशोधन आणि नावीन्यपूर्णतेसाठी जागतिक दर्जाची संस्था तयार करणे ही आमची महत्त्वाकांक्षा आहे. आम्ही शेतकऱ्यांना सक्षम करणारे तंत्रज्ञान विकसित करतो, शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणतो आणि काय शक्य आहे याची नव्याने निश्चिती करतो. उत्तर प्रदेशातून भारत आणि जगासाठी आम्ही शेतीचे भवितव्य घडविण्यास उत्सुक आहोत."

## थोडक्यात पण महत्वाचे



### महासिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ओझर विमानतळ सज्ज होणार

**ओझर : दै. संध्या**

महासिंहस्थ कुंभमेळ्यात नाशिकमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी हवाई प्रवेशद्वार ठरणाऱ्या ओझर विमानतळाचे नवे एकात्मिक टर्मिनल मार्च २०२७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. टर्मिनलसोबतच विमानतळाला जोडणारे रस्ते आणि NH-3 वरील सुरक्षा सुविधांची कामेही वेळेत पूर्ण करण्यासाठी कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी शनिवारी (१५ ऑगस्ट) पाहणी करून संबंधित यंत्रणांना कामांचा वेग वाढविण्याचे निर्देश दिले. महासिंहस्थाच्या काळात नाशिककडे देशभरातून मोठ्या संख्येने भाविक, पर्यटक आणि इतर नागरिक येणार असल्याने विमानतळाची क्षमता, त्याला जोडणारी रस्ते व्यवस्था आणि महामार्गावरील सुरक्षितता या तिन्ही बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. या पार्श्वभूमीवर ओझर विमानतळापासून पुढील रस्ते जोडणीपर्यंतच्या पायाभूत सुविधांच्या कामांचा एकत्रित आढावा घेण्यात आला. "महासिंहस्थाच्या काळात ओझर विमानतळ नाशिकचे महत्त्वाचे प्रवेशद्वार ठरणार आहे. विमानतळाचे टर्मिनल, त्याला जोडणारे रस्ते आणि महामार्गावरील सुरक्षा व्यवस्था एकाच वेळी सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक कामाच्या वेळापत्रकावर लक्ष ठेवून अडथळे दूर करण्याच्या आणि कामांना आवश्यक गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत," असे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. ओझर विमानतळावर सुरू असलेल्या नव्या एकात्मिक टर्मिनल इमारतीच्या कामाची आयुक्तांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित आणि प्राधिकरणाचे उपआयुक्त योगेंद्र चौधरी आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. बांधकामाची सद्यस्थिती आणि वेळापत्रकाचा आढावा घेत कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. ३१ मार्च २०२७पर्यंत टर्मिनलचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. टर्मिनलच्या अंतर्गत भागात प्रस्तावित कलाकृती आणि भित्तिचित्रांच्या मांडणीबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. विमानतळावर प्रवाशांची क्षमता वाढल्यानंतर त्याला सक्षम रस्ते जोडणीची आवश्यकता लक्षात घेऊन आयुक्तांनी दिंडोरी तालुक्यातील ओझर-जानोरी रोड या रस्त्यांच्या मजबुतीकरणाच्या कामांचीही पाहणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांसमवेत झालेल्या पाहणीत कामाचा वेग अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कामांना गती देऊन ३१ मार्च २०२७पर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, दहावा मैल येथील NH-3 वर १२ स्वतंत्र सुरक्षा संरचनांच्या सुरू असलेल्या कामाचीही पाहणी करण्यात आली. यामध्ये एका स्वतंत्र उड्डाणपुलाच्या संरचनेचा समावेश आहे. NHAIच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कामांची प्रगती निर्धारित वेळापत्रकानुसार असून डिसेंबर २०२६पर्यंत ती पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. महासिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर या सर्व कामांमध्ये समन्वय राखून कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, संबंधित यंत्रणांना साप्ताहिक प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### पाण्याच्या टाकीत बुडून दोन चिमुकल्या सख्ख्या बहिणींचा मृत्यू

**नाशिक : दै. संध्या**


शहरातील मानेनगरातील अयोध्यानगरी भागात असलेल्या रो-हाऊसच्या पाण्याच्या टाकीत बुडून दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाला. वृत्ती विशाल सोनवणे (८), स्वस्ति विशाल सोनवणे (५) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलींची नावे आहेत. शनिवारी रात्री उशिरा मुलींची स्वयंपाकगृहाच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीचे उघडे झाकण बंद करण्यासाठी गेली असता ही घटना उघडकीस आली. घटनेनंतर डॉक्टर असलेल्या मुलींच्या माता-पित्यांनी एकच हंबरडा फोडला. अयोध्यानगरी भागातील शुभम कॉलनीत गज गणेश रो-हाऊस २ मध्ये डॉक्टर विशाल सोनवणे हे पत्नी डॉ. शीतल सोनवणे, दोन मुली, मुलगा यांच्यासह वास्तव्यास आहेत. शनिवारी डॉक्टर माता-पिता दोन मुलींना घरी ठेवून क्लिनिकमध्ये गेले होते. क्लिनिकमध्ये जाताना त्यांनी घराच्या मुख्य दरवाजाला बाहेरून कुलूप लावले. डॉ. विशाल सोनवणे हे रुग्ण तपासणीकरिता जात त्यांनी पत्नीला मला घरी येण्यास उशीर होईल, असे सांगितले. त्यामुळे शीतल सोनवणे यांनी क्लिनिक बंद करून घर गाठले. त्यांनी घराचे कुलूप उघडले असता घरात दोन्ही मुली दिसल्या नसल्याने त्यांनी त्यांच्या नावाने आवाज दिला. मात्र प्रतिसाद मिळाला नसल्याने त्यांनी स्वयंपाकखोलीकडे धाव घेतली. त्यावेळी त्यांना किचनचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी बाहेर डोकावले असता पाण्याच्या टाकीचे झाकणही उघडेच होते. त्यामुळे त्यांनी टाकीत डोकावून बघितले असता त्यांना पाण्याच्या टाकीत मुली दिसताच त्यांनी हंबरडा फोडला. त्यांनी तत्काळ ही घटना पतीला कळविली. दोन्ही मुलींना पाण्याच्या टाकी बाहेर काढल्यानंतर शेजारी राहणारे अमोल पोतदार यांच्यासह स्थानिकांच्या मदतीने दोन्ही मुलींना खासगी रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. मध्यरात्री उशीरा शासकीय जिल्हा रुग्णालयात त्यांचे मृतदेह आणण्यात आले. याप्रकरणी म्हसरूळ पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. या हृदयद्रावक घटनेने अयोध्यानगरी, शुभम कॉलनी परिसरात शोककळा पसरली आहे. रविवारी दुपारी या सख्ख्या बहिणींवर पंचवटी अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. सोनवणे दाम्पत्याला एक दोन वर्षांचा मुलगा असून त्यांच्यावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण परिसर या दुर्घटनेने सुन्न झाल्याचे रविवारी जाणवले.

# महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होतोय!

■ **मुंबई (दै. संध्या)**

२० ते २४ ऑगस्ट दरम्यान मान्सून पुन्हा सक्रिय होणार असून, पूर्व आणि मध्य भारतात जोरदार पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. हवामानातील या बदलामुळे पावसाची तूट असलेल्या राज्यांतील हंगामातील पावसात सुधारणा होऊ शकते, तर संवेदनशील भागात पूर आणि मेघगर्जनेसह पावसाचा धोका वाढू शकतो.

पश्चिम आणि उत्तर भारतातील काही भागांमध्ये पावसाने थोडी विश्रांती असली, तरी मान्सून पुन्हा एकदा जोर धरण्याच्या तयारीत आहे. हवामान तज्ज्ञांनी, २० ऑगस्ट ते २४ ऑगस्टच्या कालावधीत मान्सून सक्रिय राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. हवामान विभागाच्या सॅटेलाईटने टिपलेल्या फोटोनुसार, पूर्व आणि मध्य भारतावर मोठ्या प्रमाणावर ढग जमा झाल्याचे आणि हवामान बदलाच्या हालचाली दिसत आहेत. फोटोतील दिसलेली स्थिती व्यापक पावसाच्या नवीन टप्प्याचे संकेत देतात. मान्सून पुन्हा सक्रिय होण्यामागे बंगालच्या उपसागरातून जमिनीकडे सरकणारा कमी दाबाचा पट्टा आणि मान्सून ट्रफची अपेक्षित हालचाल ही मुख्य कारणे आहेत. मान्सून ट्रफ हा पावसाळ्याच्या हंगामात भारतातील पावसाचे वितरण नियंत्रित करणारा एक प्रमुख घटक आहे.हवामान तज्ज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि छत्तीसगडमध्ये या महिन्यातील सर्वात लक्षणीय मान्सून सक्रिय झाल्याचे पाहायला मिळू शकते. या राज्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पाऊस होणे, अपेक्षित आहेत. बदलत्या हवामानामुळे पंजाब, हरियाणा आणि दिल्ली-एनसीआरच्या काही भागांमध्ये अनुभवलेला कोरडा टप्पाही संपणार आहे, जिथे उत्तर-पश्चिमेकडील कोरड्या वाऱ्यांनी तात्पुरती आर्द्रता कमी केली होती. मान्सून ट्रफ दक्षिणेकडे सरकल्यानंतर आणि या आठवड्याच्या शेवटी पुन्हा उत्तरेकडे सरकल्यामुळे, पावसाचा जोर उत्तर भारतातही हळूहळू पसरेल अशी अपेक्षा आहे. हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे की, २० ते २४ ऑगस्ट दरम्यानचा काळ एकूण हंगामातील पावसासाठी, विशेषतः पावसाची तूट असलेल्या राज्यांसाठी, अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो. पावसाच्या या नवीन लाटेमुळे इंडो-गंगेच्या मैदानी प्रदेशात आणि मध्य भारताच्या काही भागांमध्ये पावसाचे वितरण सुधारण्यास मदत होऊ शकते.




#### पावसाचा अंदाज, कसे असेल हवामान?

राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक या जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस काही होण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. पुढील ४८ तासांत पूर्व आणि मध्य उत्तर प्रदेश तसेच उत्तराखंडच्या पायथ्याशी सर्वाधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे या संवेदनशील भागांमध्ये स्थानिक पूर, पाणी साचणे आणि नद्यांच्या पाण्याची पातळी वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. सोमवारी (१७ ऑगस्ट) दुपारच्या आयएमडी उपग्रहाने घेतलेल्या फोटोंमध्ये पूर्व भारतात ढगांचे दाट पट्टे पसरलेले दिसले, तसेच उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि लगतच्या भागांवर गडगडाटी वादळांचे तीव्र ढग तयार होताना दिसले. बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे हे हवामान तंत्र अधिक मजबूत होऊन ढगांची निर्मिती आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## नाशिक, रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला, दोन नेत्यांच्या गळ्यात माळ

■ **नवी दिल्ली(दै. संध्या)**



रायगड आणि नाशिक जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अखेर सुटला असून, शिंदेसेनेचे मंत्री भरत गोगावलेंची रायगडच्या, तर गिरिश महाजनांची नाशिकच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शिंदेसेनेचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री भरत गोगावले यांची रायगडचं पालकमंत्रिपद मिळवण्याची इच्छा अखेर पूर्ण झाली असून, गोगावलेंची रायगडच्या पालमंत्रिपदी नियुक्ती झाल्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढाही सुटला असून, भाजपाचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांची नाशिकच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली आहे. २०२४ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीमध्ये तिढा निर्माण झाला होता. रायगडमध्ये शिंदेसेनेकडून भरत गोगावले, तर राष्ट्रवादी अजित पवार पक्षाकडून अदिती तटकरे ह्या पालकमंत्रिपदासाठी इच्छूक होत्या.

नाशिकच्या पालकमंत्रिपदावर भाजपा आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाकडून दावा करण्यात येत होता. अखेरीस या दोन्ही प्रमुख जिल्ह्यातील पालकमंत्रिपदाचा तिढा सोडवण्यात महायुती सरकारला यश आले आहे. त्यात रायगडचं पालकमंत्रिपद शिंदेसेनेच्या तर नाशिकचं पालकमंत्रिपद भाजपाच्या खात्यात गेलं आहे. तसेच रायगडच्या पालकमंत्रिपदी भरत गोगावले यांची तर नाशिकच्या पालकमंत्रिपदी गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## उपचार पूर्ण झाले म्हणजे टीबीचा धोका संपत नाही

■ **पुणे (दै. संध्या)**

डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पुणे, जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटी आणि भारताच्या राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या (NTEP) सहकार्याने करण्यात आलेल्या एका महत्त्वपूर्ण क्षयरोग (टीबी) संशोधन प्रकल्पातून, टीबीवरील उपचार पूर्ण केलेल्या व्यक्तींना भविष्यात भेडसावणाऱ्या दीर्घकालीन आरोग्य धोक्यांबाबत महत्त्वपूर्ण नवीन पुरावे समोर आले आहेत. द लॅन्सेट ग्लोबल हेल्थ या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिकात प्रकाशित झालेल्या या निष्कर्षांनुसार, टीबीवरील उपचार यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या व्यक्तींना आणि त्यांच्या घरातील संपर्कातील व्यक्तींना उपचार पूर्ण झाल्यानंतरही क्षयरोग होण्याचा लक्षणीय धोका कायम राहतो.

टीबी आफ्टरमाथ (TBAM) अभ्यासात १,०७६ टीबीमधून बरे झालेल्या व्यक्ती आणि त्यांच्या ३,३०९ घरगुती संपर्कातील व्यक्तींचा पुणे, महाराष्ट्रातील शहरी आणि ग्रामीण भागांतील सहा सरकारी टीबी क्लिनिकमध्ये पाठपुरावा करण्यात आला.

२१ जानेवारी २०२१ ते ४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत करण्यात आलेल्या या अभ्यासात उपचार पूर्ण झाल्यानंतर १८ महिन्यांपर्यंत १,०७६ टीबीमुक्त व्यक्ती आणि त्यांच्या ३,३०९ घरगुती संपर्कातील व्यक्तींचे निरीक्षण करण्यात आले. नियमितपणे NTEP अंतर्गत राबवता येईल असे प्रभावी आणि व्यापक स्तरावर लागू करता येणारे मॉडेल शोधण्यासाठी या संशोधनात उपचारानंतरच्या तपासणीच्या दोन व्यावहारिक पद्धतींची—फोनद्वारे पाठपुरावा आणि घरी जाऊन तपासणी—तुलना करण्यात आली. या अभ्यासाला अमेरिकेतील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲलर्जी अँड इन्फेक्शियस डिसीजेस (NIAID) यांचे अर्थसाहाय्य मिळाले आहे.

## छोट्या पडद्यावर विस्मयाचा अनुभव

■ **पुणे (दै. संध्या)**

जगातील परिस्थिती अनेकदा आपल्याला अस्वस्थ करणारी वाटत असताना, आशा, कल्पनाशक्ती आणि माणसांमधील नात्यांच्या सामर्थ्याची आठवण करून देणारी कथा Zee 5वरील किड्झीच्या माध्यमातून प्रेक्षकांसाठी सादर करण्यात येत आहे. 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो'चा एक्सक्लुझिव्ह प्रीमियर 21 ऑगस्ट रोजी Zee 5वरील किड्झीवर होणार आहे. मनाला स्पर्श करणाऱ्या या कौटुंबिक चित्रपटातून बालपणातील जादू, आजी-आजोबा आणि नातवंडांमधील जिव्हाळ्याचे नाते आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवल्यामुळे होणारा विलक्षण परिणाम यांचा अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे. मनीष सैनी दिग्दर्शित या चित्रपटात जॅकी श्रॉफ यांची अत्यंत अफलातून भूमिका पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाची कथा एका आगळ्यावेगळ्या नायकाभोवती फिरते. काही सुपरहिरो बाह्या नसलेला डगला घालतात. काहींकडे असामान्य शक्ती असतात. तर काहींची सर्वात मोठी ताकद इतरांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देण्यात आणि दैनंदिन आयुष्यातील जादू




अनुभवायला शिकवण्यात असते. विनोद, कल्पनारम्य जग, साहस आणि हृदयस्पर्शी भावनांची सांगड घालण्यात आलेल्या 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो'मधून सर्व वयोगटांतील प्रेक्षकांना आनंददायी आणि प्रेरणादायी अनुभव मिळणार आहे. दीपू हा एक हुशार मुलगा आहे. त्याच्या वडिलांची बदलीची नोकरी असल्यामुळे कुटुंबाला प्रत्येक वेळी नव्या शहरात जावे लागते आणि त्यामुळे दीपूला नव्याने मैत्री करणे कठीण जाते. नव्या शाळेत इतर मुलांमध्ये मिसळता यावे म्हणून तो आपल्या वर्गमित्रांना एक विलक्षण गुपित सांगतो. त्याचे आजोबा प्रत्यक्षात सुपरहिरो आहेत आणि त्यांची खरी ओळख फक्त मुलांनाच समजू शकते, असे तो त्यांना सांगतो.

## 'बॉस स्कॅम' बाबत सतर्क राहण्याचे आवाहन

■ **मुंबई (दै. संध्या)**

HDFC BANK

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेने ग्राहकांना बॉस स्कॅम (व्यावसायिक प्रमुख किंवा कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बनावट रूप धारण करणे) बाबत सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी अशा फसवणुकीबद्दल जागरूकता वाढवणे हा यामागचा उद्देश आहे.

बॉस स्कॅममध्ये, फसवणूक करणारे वरिष्ठ प्रमुख आणि विश्वासू सहकाऱ्यांचे रूप धारण करून सोशल मेसेजिंग ॲप्सवर कर्मचाऱ्यांना पैसे देण्यासाठी किंवा संवेदनशील माहिती शेअर करण्यासाठी फसवतात. फसवणूक करणारे ईमेल किंवा सोशल मीडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर मेसेज पाठवतात, ज्यामध्ये नियामक किंवा सीईओ आणि सीएक्सओ यांसारख्या कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बनावट रूप धारण केले जाते. या मेसेजमध्ये सहसा दावा केला जातो की, कंपनीने काही नियमांचे उल्लंघन केले आहे, ज्यामुळे तातडीची परिस्थिती निर्माण करून प्राप्तकर्त्यावर त्वरित कारवाई करण्यासाठी दबाव आणला जातो. फसवणूक करणारे झिप (ZIP) फाईल शेअर करतात, ज्यामध्ये अनुपालन किंवा सुरक्षेशी संबंधित कागदपत्रे असल्याचे सांगितले जाते. ही फाईल उघडल्यावर शांतपणे मालवेअर इन्स्टॉल करते. हे मालवेअर अधिकाऱ्याच्या डिवाईसला (लॅपटॉप / मोबाईल) हॅक करते, ज्यामुळे फसवणूक करणाऱ्यांना त्यांच्या खऱ्या सोशल मीडिया मेसेजिंग ॲप खात्याचा ॲक्सेस मिळतो. हॅक केलेल्या खात्याचा वापर करून फसवणूक करणारे आर्थिक किंवा लेखा विभागातील कर्मचाऱ्यांना मेसेज पाठवतात आणि त्यांना तातडीने मोठे व्यवहार करण्याचे निर्देश देतात. काही केसेसमध्ये, गुन्हेगार हॅक केलेल्या डिवाईसवर स्वतःचे नंबर सीईओच्या नावाने सेव्ह करतात, ज्यामुळे फसवणुकीचे निर्देश पूर्णपणे वैध वाटतात.

आर्थिक विनंत्यांची नेहमी स्वतंत्रपणे पडताळणी करा: कोणत्याही तातडीच्या पेमेंटच्या सूचना किंवा लाभार्थी खाते बदलण्याच्या विनंतीची थेट फोन कॉलद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून खात्री करा. अनोळखी फाईल्स कधीही इन्स्टॉल करू नका: अनोळखी स्रोतांकडून आलेल्या झिप (ZIP)/एक्झिक्युटेबल फाईल्स डाऊनलोड किंवा इन्स्टॉल करू नका, नियामक कधीही सोशल मीडिया ॲप्सद्वारे अटॅचमेंट्स पाठवत नाहीत.मररकंपनीच्या सिस्टम्सवर सॉफ्टवेअर प्रतिबंध धोरणे लागू करा. डिवाईसची ऑपरेटिंग सिस्टम आणि मालवेअर शोधणारी साधने अद्ययावत (अपडेटेड) ठेवा.

**आळंदी नगरपरिषद कार्यालय, आळंदी**

आळंदी ता. खेड, जि.पुणे-४१२१०५

Email ID- alandimc2@gmail.com

जा.क्र.आनपा/बांध/१५६३/२०२६ दि. १८/०८/२०२६

**जाहिर निविदा सुचना**

आळंदी नगरपरिषद आळंदी, ता. खेड, जि. पुणे नगरपरिषद बांधकाम विभागामार्फत १) आळंदी नगरपरिषद, आळंदी जि. पुणे येथे ज्ञानोबाची संत नगरी या सर्कलचे बांधकाम करणे. २) आळंदी नगरपरिषद, आळंदी जि. पुणे येथे ज्ञानोबाची संत नगरी या सर्कलचा विकास व सुशोभिकरण करणे. ३) आळंदी नगरपरिषद, आळंदी जि. पुणे येथे ज्ञानोबाची संत नगरी या सर्कलच्या ठिकाणी रंगकाम, विद्युत व फॅब्रिकेशनची कामे करणे. या कामासंबधिताचा सविस्तर तपशिल व वेळापत्रक नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. निविदा भरण्याची अंतिम दिनांक २१/०८/२०२६ आहे.

सही /-
मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद,
आळंदी

**पुणे महानगरपालिका**

मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय

नवीन निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक :- १९/०८/२०२६ ते दि. २५/०८/२०२६ दुपारी ३:०० पर्यंत
स्विकृती दिनांक :- १९/०८/२०२६ ते दि. २५/०८/२०२६ दुपारी ३:०० पर्यंत

तांत्रिक निविदा (पाकीट 'अ') उघडणे प्रक्रिया दिनांक :- दि. २७/०८/२०२६ दुपारी ३.०० वा.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | संचलन वेळ व झोन | वार्षिक मत्ता र. रू. | १०% अनामत रक्कम + १०% निविदा रक्कम = २०% | पार्किंग दर | कामाची मुदत | एक पाकीट/ दोन पाकीट पद्धत | निविदा संच रूपये | मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल आहे का? | कामाचा निविदा संच संपूर्ण हार्ड कॉपी/सॉफ्ट कॉपीसोबत जोडली आहे का? | नवीन काम/फेर टेंडर तपशील देणे | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pmc/Chief Eng. (Project) /2026/39 | स्व. श्री. दत्तात्रय पांडुरंग पाटील उर्फ डी.पी. पाटील (पुणे पेठ भवानी, कासेवाडी) येथील वाहनतळ मत्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे. | टेंडर गोषवारा नुसार | ५,४१,६६०/- | १,०८,३३२/- | टेंडर गोषवारा नुसार | कमाल ३ वर्षे | दोन पाकिट पद्धत | ४१५.०० | होय | होय | नवीन टेंडर | श्री. पवन मापारी (उप अभियंता) ९६८९९३७४५४ श्री. अनिकेत शिंदे (कनिष्ठ अभियंता) ७५८८२६४६४३ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
ब) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प), ३ रा मजला, मुख्य इमारत (जुने नगर सचिव कार्यालय), पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार अनामत रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.
ड) ठेकेदाराने अनामत रक्कम (इएमडी) रक्कम ऑनलाईन भरल्यास त्याची पावती 'अ' पाकिटात जोडावी.
इ) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा मंच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
ई) निविदा भरण्यापूर्वी ठेकेदार यांनी सर्व वाहनतळांची प्रत्यक्ष जागा पाहणी करूनच निविदा सादर करावी. सदरची सर्व वाहनतळे 'जेथे आहे जसे आहे' या तत्वावर संचलनास देणे आहेत. प्रत्येक वाहनतळाची पार्किंग क्षमता प्रत्यक्ष जागेवर ठेकेदार यांनी त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे खातरजमा करणे आवश्यक राहील. कार्यदिश दिल्यानंतर कोणत्याही स्वरूपाच्या तक्रारीची दाखल घेतली जाणार नाही.
फ) निविदा संचा सोबत जोडलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच सोबतच्या टेंडर घोषवारामध्ये दर्शविलेल्या झोन नुसारच पार्किंग शुल्काची आकारणी करणे बंधनकारक राहील.

सही/-
कार्यकारी अभियंता (प्रकल्प)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/५९१ दि. १८/०८/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘श्राव्यम द आंध्रा किचन’चे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते झाले उद्घाटन

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी : आपल्या अस्सल चवींनी खवय्यांची मने जिंकणारे ‘श्राव्यम द आंध्रा किचन’ हे प्रसिद्ध आंध्रा खाद्यपदार्थांचे रेस्टॉरंट चिखली येथे नव्याने सुरू झालेल्या त्यांच्या दुसऱ्या फ्रंचायझीला लॉंचच्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शुभप्रसंगी भाजप आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन झाले त्यावेळी अन्य मान्यवर ही उपस्थित होते ‘श्राव्यम द आंध्रा किचन’ला २०२५ मध्ये स्विगी आणि झोमॅटोद्वारे इंदोरमधील पहिल्या क्रमांकाचा बिर्याणी ब्रँड म्हणून सन्मानित करण्यात आले होते, तसेच २०२३ पासून ‘पॉप्युलर साऊथ इंडियन ब्रँड ऑफ इंदोर' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. ब्रँडची विश्वसनीयता आधीच प्रस्थापित झालेली असताना पुण्यातील त्यांच्या दुसऱ्या आऊटलेटच्या लॉंचच्या दिवशी खवय्यांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. खमंग चव, दर्जेदार घटक आणि परंपरेत रुजलेला जेवणाचा अनुभव एकत्र आणत श्राव्यम द आंध्रा किचनचे उद्दिष्ट पुणेकरांना आंध्राच्या समृद्ध पाककलेच्या वारशाची अस्सल चव देणे हे आहे. मेनूमध्ये गुंटूर स्पेशल पोडी इडली, टिपू चायना इडली, कढपा स्पेशल कारम डोसा, म्हैसूर बोन्डा, लेमन राईस, हैदराबादी बिर्याणी आणि डबल का मीठा इत्यादी अत्यंत आवडत्या पदार्थांसह आंध्राचे पारंपारिक मसाले आणि पाककृती वापरून तयार केलेल्या अनेक अस्सल शाकाहारी खाद्यपदार्थांचा समावेश आहे. चिखली वेगाने नवे फूड डेस्टिनेशन म्हणून उदयास येत असताना श्राव्यम द आंध्रा किचन खवय्यांना आपुलकी, अस्सलता आणि आंध्रप्रदेशच्या समृद्ध पाककलेचा मिलाफ असलेला अनुभव देण्याची आशा करते. उद्घाटनप्रसंगी मत व्यक्त करताना भाजप आमदार श्री. महेश लांडगे म्हणाले, "नवीन व्यवसाय आपल्या खाद्य आणि व्यावसायिक परिसंस्थेच्या वाढीस हातभार लावत त्यांच्या सेवांचा विस्तार करण्यासाठी चिखली आणि पिंपरी-चिंचवडला पहिली पसंती देत आहेत हे पाहणे आनंददायी आहे. पुण्यातील व्यक्तींपर्यंत आंध्राची अस्सल चव पोहोचवत असताना श्राव्यम द आंध्रा किचन आणि त्यांच्या टीमला माझ्याकडून मनापासून शुभेच्छा. श्राव्यमचे संस्थापक वेंकट राघवेंद्र राव म्हणाले, "आम्ही श्राव्यम द आंध्रा किचन सुरू केले, तेव्हा आम्हाला केवळ आणखी एक रेस्टॉरंट उघडायचे नव्हते. आम्हाला लोकांना अस्सल तेलुगू चव, परंपरा आणि संस्कृतीचा अनुभव घेता येईल असे ठिकाण निर्माण करायचे होते. इंदोरने आमचे मनापासून स्वागत केले आणि २०२३ पासून आम्हाला ‘पॉप्युलर साऊथ इंडियन ब्रँड ऑफ इंदोर' पुरस्काराने सन्मानित केले, ज्यामुळे आम्हाला तीच ऊर्जा पुण्यात आणण्याचा आत्मविश्वास मिळाला. आम्ही हा नवीन प्रवास सुरू करण्यासाठी आणि आता पुणेकरांच्या मनात आपले स्थान निर्माण करण्यासाठी अत्यंत उत्सुक आहोत."“पुणे नेहमी नवीन चवी आणि संस्कृती अनुभवण्याची आवड असणारे शहर राहिले आहे. प्रत्येक घासात तिथल्या प्रादेशिक संस्कृतीची झलक दिसेल अशा अस्सल आंध्रा खाद्यसंस्कृतीची पुण्याला ओळख करून देणे हा आमचा एकमेव उद्देश होता. अगदी मऊसूद इडलीपासून ते कारम डोशापर्यंत, इंदोरमध्ये आम्ही ज्या आपुलकी आणि अस्सलतेसाठी ओळखले जातो, तीच गुणवत्ता येथेही कायम राहील, याची खात्री केली आहे. ही तर फक्त सुरुवात आहे, आमच्या ग्राहकांच्या पाठिंब्याने आम्ही आणखी विस्तार करण्यास उत्सुक आहोत," असे पुण्यातील फ्रेंचायझी मालक नागेश हनमंत पाटील म्हणाले. विविध आणि अनोख्या खाद्यपदार्थांवरील प्रेमासाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात ही टीम आपल्या नव्याने सुरू झालेल्या आऊटलेटमध्ये ग्राहकांचे स्वागत करण्यासाठी आणि शहराला आंध्रप्रदेशच्या अस्सल चवीचा आस्वाद देण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे.

### श्रीधर जगताप यांची पश्चिम महाराष्ट्र प्रसिद्धी प्रमुखपदी निवड

**पिंपरी : दैनिक संध्या**



ह्युमन राईट असोसिएशन फॉर प्रोटेक्शनच्या पश्चिम महाराष्ट्र प्रसिद्धी प्रमुखपदी श्रीधर जगताप यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकारिता, सामाजिक प्रश्नांचे प्रभावी वार्तांकन आणि अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठविण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जगताप हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय तसेच जनसामान्यांच्या विविध प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत आहेत. वंचित, पीडित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांना प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेशाचे उपाध्यक्ष श्री. लक्ष्मण दवणे यांनी श्रीधर जगताप यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. “मानवी हक्कांचे संरक्षण, अन्यायाविरुद्ध आवाज आणि समाजसेवा ही संघटनेची मूलभूत उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांना श्रीधर जगताप यांच्या पत्रकारितेचा अनुभव, सामाजिक जाण आणि प्रभावी प्रसिद्धी कौशल्याची निश्चितच मोठी साथ मिळेल. त्यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम महाराष्ट्रातील संघटनेचे प्रसिद्धी कार्य अधिक व्यापक, प्रभावी आणि गतिमान होईल,” असा विश्वास लक्ष्मण दवणे यांनी व्यक्त केला. जगताप यांच्या माध्यमातून संघटनेच्या सामाजिक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळून मानवी हक्कांच्या प्रश्नांबाबत समाजात अधिक प्रभावी जनजागृती निर्माण होईल, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. “मानव सेवा – देश सेवा – हीच ईश्वर सेवा!” या विचाराने प्रेरित होऊन श्रीधर जगताप यांनी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी अधिक प्रभावीपणे जपावी आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी योगदान द्यावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

### पुणेरी यलमार स्नेहमेळावा उत्साहात; ‘झेप’ पुस्तकाचे प्रकाशन

**पिंपरी : दैनिक संध्या**

पुणेरी यलमार परिवाराच्या वतीने आयोजित स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी अमोल येलमर लिखित ‘झेप : अस्तित्वातून कर्तृत्वाकडे’ या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना विशेष पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कार्यक्रमाला रंगनाथ यलमार, जी. एस. माडगूळकर, अमोल माडगूळकर, शशिकांत येलपले, डॉ. बिपीन विभुते, सुभाष यलमार, राजाराम येलपले, कल्पना अंपळकर, आशा चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ‘आरोग्य दूत’ पुरस्काराने डॉ. बिपीन विभुते, ‘क्रीडा गौरव’ पुरस्काराने दिलीप येलपले, ‘रोजगार भूषण’ पुरस्काराने दत्ता विभुते व सारंग गिड्डे यांचा गौरव करण्यात आला. तसेच ‘प्रगतीशील शेतकरी’ पुरस्काराने दत्तात्रय (बापू) कोळवले, साधू किसन कोळवले आणि संजय सीताराम चौगुले यांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय ‘युद्धवीर गौरव’ पुरस्काराने किसन घाटुळे, ‘ज्ञानसेवा गौरव’ पुरस्काराने संजय चौगुले, तर ‘नारी शक्ती उड्डाण गौरव’ पुरस्काराने कु. रेवती लोकरे यांचा सन्मान करण्यात आला.

# ट्रायोज-झूलेलाल टॉवर रस्त्याच्या प्रश्नावर महत्त्वपूर्ण बैठक

## सहा महिन्यांत कामाला गती देण्याचे शत्रुघ्न काटे यांचे आश्वासन

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपळे सौदागर येथील ट्रायोज ते झूलेलाल टॉवर सोसायटी परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या मुख्य रस्ता आणि वाहतूक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत स्थानिक नागरिकांसोबत थेट संवाद साधत नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका कुंदाताई भिसे आणि नगरसेविका अनिताताई काटे यांनी रस्त्याच्या कामाला गती देण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली.

या बैठकीदरम्यान रस्त्याची सद्यस्थिती, कामातील तांत्रिक व प्रशासकीय अडथळे तसेच रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. परिसरातील वाढती लोकसंख्या, वाहतुकीची वाढती कोंडी आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांनी केली.

नागरिकांच्या समस्या ऐकून घेत नगरसेवकांनी येत्या सहा महिन्यांत रस्ता रुंदीकरणाच्या प्रक्रियेला गती देऊन प्रत्यक्ष कामात लक्षणीय प्रगती दिसून येईल, असे आश्वासन दिले. नागरिकांची सुरक्षितता आणि सुरळीत दळणवळण ही आमची प्राथमिक जबाबदारी असून, रस्त्याच्या कामातील अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

नगरसेवकांच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे ट्रायोज आणि झूलेलाल टॉवर परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीस स्थानिक नागरिक, सोसायटीचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि परिसरातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोशीकरांच्या विरोधाला केराची टोपली

## ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्प लादण्याचा प्रशासनाचा डाव

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोमध्ये ३७५ टन क्षमतेचा बायो-सीएनजी (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्प राबवण्यावरून पुन्हा एकदा मोठा वाद निर्माण झाला आहे. मोशी कचरा डेपोत याआधी झालेल्या दुर्घटनेत नऊ जणांचा बळी गेलेला असताना आणि स्थानिक नागरिक व नगरसेवकांचा तीव्र विरोध असतानाही, हा प्रकल्प रेटून नेण्याचा घाट प्रशासनाने घातला आहे. विशेष म्हणजे, गेल्या महिन्याभरापासून यावर चर्चा सुरू असतानाही हा विषय अधिकृतपणे समितीसमोर ठेवण्यात आलेला नाही, तर ऐनवेळचा विषय म्हणून तो परस्पर मंजूर करून घेण्याचा प्रशासनाचा डाव असल्याचा गंभीर आरोप होत आहे.



स्थानिक नागरिक आणि जनप्रतिनिधींचा तीव्र विरोध डावलून, हा प्रकल्प कोणत्याही पूर्वचर्चेविना थेट स्थायी समितीच्या बैठकीत ऐनवेळचा विषय म्हणून आणून बळच मंजूर करून घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे स्थायी समितीचे सभापती आणि सदस्यांनाही अंधारात ठेवले जात असून, यामागे मोठे अर्थकारण असल्याचा संशय विरोधकांनी व्यक्त केला आहे.

या प्रकल्पासाठी पूर्वी प्रति टन १०५० किंवा १६०० रुपये असणारे टिपिंग चार्जेस आता थेट ३६६१ रुपये प्रति टन इतके प्रचंड वाढवून देण्यात येत आहेत. कोणतीही ठोस मेहनत न करता कंत्राटदार स्वतः सीएनजी तयार करून तो बाजारात विकणार आणि त्याचे पैसे स्वतः घेणार आहे, तर पालिकेने मात्र ३० वर्षांसाठी कंत्राटदाराला भरमसाठ पैसे मोजावे लागणार आहेत. मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेच्या जखमा अद्याप ताज्या असताना, तिथेच पुन्हा अशाप्रकारचे धोकादायक आणि खर्चिक प्रकल्प लादून प्रशासन नेमके काय साध्य करू पाहतेय? असा संतप्त सवाल मोशीकरांनी उपस्थित केला आहे. प्रभागामध्ये इतरत्र जागा शोधण्याचे सर्व पर्याय फेटाळून लावून जाणीवपूर्वक मोशीतच हा प्रकल्प थोपवला जात आहे.

# ६०० हून अधिक नागरिकांना मोफत स्मार्ट कार्डचे वाटप

■ वाकड (दै. संध्या)

नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवेचा अधिक सुलभ आणि सोयीस्कर लाभ मिळावा या उद्देशाने आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रणजित आबा कलाटे फाउंडेशनच्या वतीने मोफत NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्ड वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम वाकड येथील सौ. स्नेहा रणजित कलाटे जनसंपर्क कार्यालयात पार पडला.

“काम हीच ओळख, सेवा हीच शक्ती” या ब्रीदवाक्यानुसार राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत परिसरातील ६०० हून अधिक नागरिकांना मोफत NCMC स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे आणि रणजित आबा कलाटे यांच्या हस्ते नागरिकांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घेतला. सार्वजनिक वाहतूक अधिक सुलभ, आधुनिक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. मोफत NCMC स्मार्ट कार्ड उपलब्ध करून दिल्याबद्दल नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले. नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे भविष्यातही अशाच लोकाभिमुख आणि सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याचे स्नेहा रणजित कलाटे यांनी सांगितले.

# ट्रॅव्हल्स बसेसमुळे शहरात वाहतूक कोंडी

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असलेल्या ट्रॅव्हल्स बसेसवर नियंत्रण आणण्यासाठी सकाळी ९ ते रात्री ९ या कालावधीत शहरात त्यांच्या वाहतुकीवर बंदी घालावी, अशी मागणी युवासेनेचे उपशहरप्रमुख कुणाल जगनाडे यांनी पोलीस आयुक्त आणि महापौर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जगनाडे यांच्या निवेदनानुसार, वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच ट्रॅव्हल्स बसेस विनानियोजन आणि विनापरवानगी शहरातील प्रमुख चौक, बसथांबे, उड्डाणपूल आणि मुख्य रस्त्यांवर थांबत असल्याने वाहतुक विस्कळीत होत आहे. प्रवासी चढविणे-उतरविण्यासाठी वारंवार थांबणाऱ्या या बसमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नाशिक फाटा, सीआयआरटी गेट, राजमाता जिजाऊ कमान, भोसरी उड्डाणपूल, गणेश साम्राज्य चौक, स्पाईन चौक, घरकुल चौक, भक्ती-शक्ती चौक, प्राधिकरण, रावेत, बिर्ला हॉस्पिटल, डांगे चौक, भूमकर चौक, वाकड, दापोडी आणि सांगवी आदी भागांमध्ये टुरिस्ट बसेस मोठ्या प्रमाणात थांबत आहे. या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका आयटी क्षेत्रातील कर्मचारी, एमआयडीसीतील कामगार, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना बसत असून रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या वाहनांनाही मार्ग मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचे जगनाडे यांनी नमूद केले.

# शिवतेज नगर, श्री स्वामी समर्थ मंदिर येथे नागपंचमी उत्साहात साजरी

■ पिंपरी(दै. संध्या)

हिंदू धर्मातील सर्व सण निसर्ग आणि पर्यावरणाशी संबंधित आहेत. त्यातीलच एक श्रावण महिन्यातील मुख्य सण म्हणजे नागपंचमी.

नागाला शेतकऱ्यांचा मित्र म्हणून संबोधले जाते. यावर्षीची नागपंचमी श्रावणातील पहिल्या सोमवारी आल्यामुळे हा एक दुग्ध शर्करा योग आहे.

शिवतेज नगर मधील श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान आणि ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे यांनी महिलांसाठी नागपंचमी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रत्येकीला माहेरी आल्याची भावना निर्माण होत आहे मत नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी महिलांना नागपंचमीनिमित्त शुभेच्छा देताना व्यक्त केले. शिवतेज नगर, चिंचवड येथील घरकुल चौकाजवळ श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रावण मास निमित्त नागपंचमी उत्सव आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शेकडो महिलांनी नाग प्रतिमेचे पूजन केले. तसेच पारंपरिक पद्धतीचा झिम्मा, फुगडी, फेर आणि नृत्य सादर करून झोके खेळण्याचा देखील आनंद घेतला. येथे नारायण बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. नागपंचमी हा महिलांचा सण, निसर्गातील प्रत्येक प्राण्या विषयी आदर व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला होतो. पंचमीला यापूर्वी महिला आठवडाभर आधी माहेरी जात असत.

विविध खेळ कार्यक्रम करत करायच्या असे महिला कार्याध्यक्ष सारिका रिकामे यांनी सांगितले. नागाची प्रतिमा आणि कृत्रिम वारूळ तयार करून याची पूजा करण्यात आली आहे. दूध, पाणी, नारळ यामुळे नागांची हानी होऊ नये म्हणून येथे कृत्रिम वारूळ तयार केले आहे. नाग पंचमी महिलांसाठी जिव्हाळ्याचा सण आहे असे महिला उपाध्यक्ष अंजली देव यांनी सांगितले. नागपंचमीचा सण साजरा करण्यामागे एक पौराणिक कथा आहे की श्रीकृष्ण जेव्हा गोकुळात होते तेव्हा कालिया नागाने यमुना नदीत खूप थैमान मानले होते.

श्रीकृष्णाने याच दिवशी कालिया नागाचे मर्दन केले म्हणून नागपंचमी साजरी केली जाते असे कार्याध्यक्ष छाया महाजन यांनी सांगितले. तसेच ज्येष्ठ महिला शांताबाई वायाळ, मंगल काळे यांनी पारंपरिक गाणी गायली.

# डॉ. डी. वाय. पाटील यांना शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली


■ पिंपरी (दै. संध्या)

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी येथे आज (१२ ऑगस्ट २०२६) सायंकाळी माजी राज्यपाल आणि डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे संस्थापक पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (दादा) (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून पाटील परिवाराचे सांत्वन केले व दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) दादांच्या निधनाने शिक्षणविश्वावर तीव्र शोककळा पसरली असून, एका महान युगाचा अंत झाला आहे. ज्ञान, संस्कार, दूरदृष्टी आणि मानवतेचा अखंड दीप प्रज्वलित ठेवणारे एक थोर शिक्षणमहर्षी म्हणून दादा ओळखले जात. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी केवळ शैक्षणिक संस्थांचे जाळे उभे केले नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार दिला, नैतिक मूल्यांची जोपासना केली आणि शिक्षणाला खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, साधेपणा, मानवतावादी दृष्टिकोन आणि शिक्षणाप्रती असलेली अखंड निष्ठा येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.

पाटील परिवाराकडून सांत्वनपर भेटीचा स्वीकार: याप्रसंगी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलपती व ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या कुलपती व अध्यक्षा डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी (अभिमत विद्यापीठ), कोल्हापूरचे कुलपती व अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष व आमदार श्री. सतेज डी. पाटील, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीचे प्र-कुलपती व डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटीचे सचिव डॉ. सोमनाथ पी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. सौ. स्मिता जाधव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणेचे विश्वस्त व खजिनदार डॉ. यशराज पी. पाटील यांच्यासह पाटील परिवारातील सदस्यांनी उपस्थितांच्या सांत्वनपर भेटींचा स्वीकार केला.



या शोकसभेला शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय, साहित्यिक, सामाजिक, क्रीडा, कृषी, अध्यात्मिक, शासकीय व वैद्यकीय क्षेत्रांतील असंख्य मान्यवर उपस्थित होते. तसेच शिक्षण समूहातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपूर्ण विद्यापीठ सभागृह शोकाकुल वातावरणात बुडून गेले होते. उपस्थितांनी दादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पवित्र स्मृतीस अत्यंत नम्रभावाने अभिवादन केले. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून शोक व्यक्त केला. त्यानंतर पवित्र गीता पठण, प्रार्थना आणि दादांच्या जीवनप्रवासावर आधारित भावस्पर्शी चित्रफीत (Short Film) दाखवली जात असताना सभागृहातील वातावरण पूर्णपणे गहिवरून गेले होते; उपस्थितांचे मन हेलावून गेले, डोळे अश्रूंनी पाणावले.

दादा हे केवळ एका शैक्षणिक समूहाचे संस्थापक नव्हते, तर आम्हा सर्वांचे भक्कम आधारस्तंभ आणि मार्गदर्शक होते. 'शिक्षणातून समाजविकास' हा त्यांनी दिलेला मंत्र आणि त्यांनी जपलेली मूल्ये हीच आमची खरी पुंजी आहे. त्यांनी उभारलेला हा ज्ञानाचा वटवृक्ष असाच बहरत ठेवणे आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर निष्ठेने चालणे, हिच त्यांना श्रद्धांजली ठरेल, असे डॉ. पी. डी. पाटील (कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे) यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सुकलवाडीच्या उपसरपंचपदी योगेश पवार यांची वर्णी

**पुरंदर : दैनिक संध्या**

सुकलवाडी (ता. पुरंदर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी योगेश मारूती पवार यांची वर्णी लागली आहे. यावेळी तत्कालीन उपसरपंच उर्मिला पवार यांनी राजीनामा दिल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच संदेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या निवडणुकीत उपसरपंच पदांसाठी योगेश मारूती पवार यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सोनल जगदाळे यांनी दिली. या दरम्यान नवनिर्वाचित उपसरपंच योगेश पवार यांचा सत्कार सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार तसेच वाल्हे गावचे माजी सरपंच दत्तात्रेय पवार महादेव चव्हाण यांसह विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला . तर जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिगंबर दुर्गाडे जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष नारायण पवार तसेच धनंजय पवार संतोष पवार साईनाथ चव्हाण सुभाष पवार आदींसह ग्रामस्थांनी नवनिर्वाचित उपसरपंच योगेश पवार यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपसरपंच ऊर्मिला पवार तसेच नितीन गावडे अमित पवार वैजयंता दाते संतोष पवार दत्तात्रेय पवार हर्षदा पवार आदींसह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.



### चाकणला विद्यानिकेतन प्रशालेत नागपंचमी उत्साहात साजरी

**चाकण : दैनिक संध्या**

एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या येथील विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम प्रशालेत नागपंचमी पारंपारिक पद्धतीने मोठ्या दिमाखात साजरी करण्यात आली. नागपंचमीनिमित्त भारतीय संस्कृती आणि पर्यावरणाचा संदेश, सर्प हा शेतकऱ्यांचा मित्र या विषयावर सर्पमित्र अतुल सवाखंडे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रोहिणी देशमुख, प्राचार्या रैना मून, संचालक अक्षय देशमुख, सुमन देशमुख, हर्षल देशमुख, निकिता काळे, निकिता त्रिवेदी, अमृता जाधव, वंदना शेळके, गायत्री गुंजन, प्रणिता वैद्य, गीता प्रभू, दिशा पगार, वर्षा पवळे, विद्या व्हिजनच्या मुख्याध्यापिका निलम सिंग, स्नेहित भालेराव, मनीष भुजबळ आदी उपस्थित होते. सवाखंडे यावेळी म्हणाले," श्रद्धा, उत्साह आणि सांस्कृतिक वातावरणात नागपंचमीचा सण हा मोठ्या दिमाखात साजरा होणे अपेक्षित आहे. शिक्षक व शालेय विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीची जपवणूक झाली पाहिजे. निसर्ग आणि प्राण्यांप्रती दयाभाव निर्माण व्हावा, या उद्देशाने जनजागृतीसाठी लोकोपयोगी उपक्रम राबवले पाहिजेत. नाग हा शेतकऱ्यांचा मित्र असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यात त्याची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. विद्या व्हिजन किडीझच्या मुख्याध्यापिका नीलम सिंह यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रोहिणी देशमुख यांनी स्वागत केले. रैना मुन यांनी सूत्रसंचालन, तर गीता प्रभू यांनी आभार मानले.

### पीएमपीएमएलच्या तिकीट मशीनमधून अनेक गावांची नावे गायब

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**



पुणे शहरातील असे अनेक विभाग आहेत की ग्रामीण भागातुन त्यांना पैसे मिळतात तरी ते ग्रामीण भागावर अन्याय करत आले आहेत .याचे उत्तम उदाहरण पुणे महानगर परिवहन महामंडल लिमिटेड म्हणजेच पीएमपीएमएल होय . हडपसर ते वरवंड मार्गावरील पीएमपीएमएल बसच्या तिकीट व्यवस्थेत प्रवाशांना त्यांच्या गावाचे नावच मिळत नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लोणी काळभोरच्या नावाऐवजी 'रामाकृषी कारखाना', तर काही ठिकाणी गावांच्या नावांऐवजी हॉटेल, मंगल कार्यालये आणि इतर ठिकाणांची नावे तिकीटावर छापली जात असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकाराची तातडीने दखल न घेतल्यास 'पीएमपीएमएल बस रोको' आंदोलन करण्याचा इशारा रेल्वे प्रवासी सेना तथा शिवसेनेचे हवेली विभागप्रमुख अनिल दशरथ शिंदे यांनी दिला आहे. पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक यशवंत हिंगे यांची शिंदे यांनी भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी प्रशासनाने मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे कि, वरवंड ते हडपसर दरम्यान लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, सोरतापवाडी आणि कुंजीरवाडी यांसारखी मोठी गावे आहेत. मात्र, या गावांमध्ये उतरायचे असतानाही तिकीट मशीनमध्ये संबंधित गावांची अधिकृत नावे उपलब्ध नसल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे. विशेषतः उरुळी कांचनहून लोणी काळभोरला येणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटावर 'लोणी काळभोर'ऐवजी 'रामकृषी रसायन कारखाना' असे नाव येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तिकीटावरील नाव आणि प्रत्यक्ष उतरायचे ठिकाण यामध्ये फरक आहे. काही बसथांब्यांची नावे बदलून त्याऐवजी हॉटेल, मंगल कार्यालये अथवा कारखान्यांची नावे तिकीट मशीनमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे पीएमपीएमएलच्या तिकीट व्यवस्थेत गावांची अधिकृत ओळखच का बाजूला सारली जात आहे ? असा सवाल उपस्थित होत आहे. प्रवाशांना नेमक्या ठिकाणी उतरायचे असल्याने तिकीटावर प्रत्यक्ष बसथांबा किंवा संबंधित गावाचे अधिकृत नाव असणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवाशांना तिकीट तपासणीच्या वेळी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. बसथांब्यांची नावे कोणत्या आदेशानुसार बदलण्यात आली, त्यासाठी कोणती मंजुरी घेण्यात आली, जुने व नवीन नाव काय आहे आणि तिकीट मशीनमध्ये हे बदल कोणी केले, याची माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी रेल्वे प्रवासी सेनेने केली आहे. प्रवाशांना ज्या गावात उतरायचे आहे, त्याच गावाचे किंवा अधिकृत बसथांब्याचे नाव तिकीटावर देण्यात यावे. तिकीट मशीनमधील चुकीची व संभ्रम निर्माण करणारी नावे तातडीने दुरुस्त करावीत, अशी मागणी अनिल दशरथ शिंदे यांनी केली आहे. प्रवाशांकडून तिकीटाचे पैसे घेताना त्यांच्या प्रवासाच्या ठिकाणाची स्पष्ट नोंद तिकीटावर असणे हा त्यांचा अधिकार आहे. गावांची नावे हटवून इतर ठिकाणांची नावे देण्याचा प्रकार तातडीने थांबवावा. अन्यथा प्रवाशांच्या हितासाठी पीएमपीएमएल बस रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिंदे यांनी दिला.

# स्वातंत्र्यदिनी कुंभार बांधवांना हक्काची ओळख

## तहसीलदार बाळासाहेब म्हस्केंच्या पुढाकाराने शासन निर्णयाची गतिमान अंमलबजावणी

■ **कवठे येमाई: (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाने १० जून २०२६ रोजी कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाचे संरक्षण, सामाजिक सक्षमीकरण आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाची शिरूर तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शिरूरचे कर्तव्यदक्ष तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या पुढाकाराने कुंभार समाजातील पात्र बांधवांना अधिकृत ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. हक्काचे अधिकृत ओळखपत्र हातात मिळाल्याने कुंभार समाज बांधवांमध्ये आनंद आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.



यावेळी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी सांगितले की, "१० जून २०२६ चा शासन निर्णय हा पारंपरिक मातीकाम करणाऱ्या कुंभार समाजाच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र कारागिरापर्यंत पारदर्शकपणे पोहोचविणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. अधिकृत ओळखपत्रामुळे योजनांचा लाभ घेणे, प्रशासकीय कामकाज तसेच व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये समाजबांधवांना निश्चितच सुलभता येईल."

शासन निर्णयाची केवळ कागदोपत्री अंमलबजावणी न करता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ पोहोचावा, यासाठी तहसीलदार म्हस्के यांनी विशेष पुढाकार घेतला. पात्र लाभार्थ्यांची माहिती संकलित करणे, यादी तयार करणे आणि ओळखपत्रांची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी तहसील कार्यालयातील लिपिक भानुदास येडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या कार्यक्रमास तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अमोल भोसले, राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे अध्यक्ष भगवान श्रीमंदीलकर, नगरसेविका सविता राजापूरे, नगरसेविका स्वप्नाली जामदार, मच्छिंद्र जामदार, शिरूर ग्रामीणचे माजी सरपंच रामदास जामदार, शशिकांत शिर्के, विजय शिर्के, दत्तात्रय काळे यांच्यासह कुंभार समाजातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

प्रशासनाच्या या सकारात्मक आणि तत्पर भूमिकेमुळे शिरूर तालुक्यातील कुंभार समाजामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, शासन निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ समाजातील अधिकाधिक पात्र बांधवांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### राजर्षी शाहू प्रतिष्ठानच्या पाठपुराव्याला यश

कुंभार समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे भगवान अंजना रामचंद्र श्रीमंदीलकर, संपादक जागृत्त शोध, प्रदेशाध्यक्ष दक्ष मराठी पत्रकार संघ तथा अध्यक्ष राजर्षी शाहू प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रयत्नांनाही या उपक्रमामुळे यश आले.

श्रीमंदीलकर यांनी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के आणि लिपिक भानुदास येडे यांचे आभार मानताना सांगितले की, "शासनाच्या १० जूनच्या निर्णयाची कमी कालावधीत प्रभावी अंमलबजावणी करून कुंभार समाजाला सन्मानाची ओळख मिळवून दिल्याबद्दल संपूर्ण समाजाच्या वतीने प्रशासनाचे आभार. स्वातंत्र्यदिनी मिळालेले हे ओळखपत्र आमच्यासाठी केवळ कागदाचा तुकडा नसून हक्क, स्वाभिमान आणि नव्या ओळखीचे प्रतीक आहे."

## शिरूर तालुक्यात ५,४८५ शिधापत्रिकांवरील धान्य बंद

### सहायक पुरवठा अधिकारी दीपक केदार यांची माहिती

■ **कवठे येमाई (दै. संध्या)**

केंद्र शासनाच्या 'मिशन सुधार' अंतर्गत राज्यातील शिधापत्रिकांची तपासणी सुरू असून, राज्यभरातील सुमारे ६० हजारांच्या आसपास शिधापत्रिका वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना स्वस्त धान्याचा लाभ मिळणे बंद झाले आहे.तर पुणे जिल्ह्यातील हजारो शिधापत्रिका सह शिरूर तालुक्यात ५,४८५ शिधापत्रिकांवरील धान्य बंद झाले असल्याची माहिती शिरूर तालुका सहायक पुरवठा निरीक्षण अधिकारी दीपक केदार यांनी दिली आहे.

या कारवाईत पुणे जिल्ह्यातील हजारो शिधापत्रिका वगळण्यात आल्या आहेत. शिधापत्रिका वगळण्यात पुणे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. वगळण्यात आलेल्या सर्वाधिक शिधापत्रिका कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत.

शासनाच्या तपासणीत अपात्र, दुबार, मृत तसेच स्थलांतरित लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या शिधापत्रिकांचा शोध घेण्यात येत आहे. यामुळे पात्र लाभार्थ्यांनाच धान्याचा लाभ मिळावा आणि शासनाच्या धान्य वितरणातील गैरप्रकाराला आळा बसावा, हा या मोहिमेचा उद्देश आहे. दरम्यान, शिधापत्रिका वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पुरवठा कार्यालयामार्फत पडताळणी सुरू करण्यात आली आहे. पात्रता सिद्ध करणाऱ्या लाभार्थ्यांना आवश्यक तपासणीनंतर पुढील कार्यवाही केली जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील हजारो शिधापत्रिका वगळण्यात आल्याने संबंधित लाभार्थ्यांनी आपल्या शिधापत्रिकेची स्थिती तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन संबंधित यंत्रणेकडून करण्यात येत आहे. शिरूर तालुक्यात एकूण ५४८५ शिधापत्रीकांचे धान्य बंद करून सदर शिधापत्रिका पांढऱ्या म्हणजेच APL White करण्यात आल्या आहेत.

सदर ५४८५ शिधापत्रिका मध्ये उच्च उत्पन्न गट जसे कि मासिक पगार मिळणारे खाजगी कर्मचारी, IT रिटर्न भरणारे नागरिक, उद्यम पोर्टल वरती व्यावसायिक रेजिस्ट्रेशन असलेल्या व्यक्ती, सोसायटी अथवा कंपनी च्या बॉडी वरील डायरेक्टर इ. लोकांचा समावेश आहे.केंद्र शासनाच्या मिशन सुधार ( Rightful Targeting of Beneficiaries) अंतर्गत हे कार्ड PHH व अंत्योदय योजनेतून वगळून APL white या योजनेत टाकली जात असल्याची माहिती देखील केदार यांनी दिली आहे.

## माजी आमदार संजय चंदूकाका जगताप यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वर महादेवास महारुद्राभिषेक



■ **सासवड (दै. संध्या)**

सासवड येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही श्रावण उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या महारुद्राभिषेक व महापूजेचा मान माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप आणि सौ. राजवर्धिनी संजय जगताप यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी श्री सिद्धेश्वर महादेवास पितळेची सुवर्ण प्रभावळ अर्पण करण्यात आली.

श्रावण उत्सवानिमित्त १६ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता श्री सिद्धेश्वर भजनी मंडळाच्या वतीने एकतारी भक्तिसंगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर रात्री ११ वाजल्यापासून पहाटे ७ वाजेपर्यंत उत्तरा देवी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रुद्राभिषेक व महापूजेचे आयोजन करण्यात आले.

१७ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता माजी आमदार संजय चंदूकाका जगताप व सौ. राजवर्धिनी संजय जगताप यांच्या हस्ते महारुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर गणेश सरनाईक काका यांच्या हस्ते महाआरती पार पडली. या धार्मिक सोहळ्याला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता सासवड पोलीस ठाण्याच्या वतीने मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सासवड नगर परिषदेच्या वतीने मंदिर तसेच मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांवर प्रकाशव्यवस्थाही करण्यात आली होती.

केतकावळे येथील बालाजी मंदिर व्यवस्थापनाचे बाळासाहेब बाटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता व्यवस्था केली. त्यामुळे उत्सव काळात भाविकांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध झाले.

श्री सिद्धेश्वर महादेव देवस्थान मंदिर सासवड सुधार समितीच्या वतीने उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व भाविक, देणगीदार, प्रशासन, पोलीस, नगर परिषद आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

### हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

उत्सवानिमित्त सकाळी ९ वाजता भाविकांसाठी खिचडी महाप्रसाद व फराळाचे वाटप करण्यात आले. श्री. तुषार बंटी जगताप, डॉ. सुमित काकडे, नंदकुमार जगताप, अतुलशेठ जगताप, संदिप टिळेकर, संदिप मेरुकर, सुनीलकाका जगताप, मोहनआप्पा जगताप आणि सुरज उत्तम जगताप यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सासवड शहरासह परिसरातील हजारो नागरिकांनी श्री सिद्धेश्वर महादेवाचे दर्शन घेतले तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## चाकणला नगराध्यक्षा व नगरसेविकेंनी गाजवला कानबाई माता महोत्सव

■ **चाकण (दै. संध्या)**

शासनाकडून सर्वसामान्यांकरता विविध प्रकारच्या योजना येत असतात. त्या योजनांचा लाभ सर्वांना मिळणे अपेक्षित आहे. भापसे पार्टीच्या माध्यमातून वंचितांना न्याय देण्यासाठी आम्ही निश्चित प्रयत्न करू असे ठोस आश्वासन भापसे पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा जयश्री ताटे यांनी दिले.

भापसे पार्टीच्या वतीने पक्षप्रमुख दीपक ताटे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात मार्गदर्शन करताना जयश्री ताटे बोलत होत्या. याप्रसंगी लता गायकवाड, पल्लवी देडे, भाग्यश्री ताटे, काजल आव्हाळे, समाधान ताटे, उत्तम लोंढे, जालिंदर उपाडे, अश्रुबा जाधव, राजासाहेब देडे, विश्वनाथ गायकवाड, दत्तात्रय कळसकर, तेजस सोनवणे, किरण टंकसाळे, अलका सुरवसे, सतीश सुरवसे, सुवर्णा लोंढे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी जयश्री ताटे यांच्या हस्ते कर्तबगार नागरिकांचा सन्मान



करण्यात आला. ताटे पुढे म्हणाल्या, " चाकण भागात सध्या पायाभूत सुविधा कोलमडलेल्या आहेत. रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. वाहतूक कोंडीने तर अक्षरशः कळस गाठला आहे.

जनावरांना चालताना लाज वाटेल असे चाकण भागातील रस्ते झाले आहेत. चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलामुळे रोज निष्पाप नागरिकांचे नाहक बळी जात आहेत. विकास कामांचा बट्ट्याबोळ झाला असताना प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. सर्वसामान्य नागरिक मरण यातना सहन करत असताना प्रशासन फक्त घोषणा देऊन नागरिकांच्या तोंडाला पाने पुसत आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिल्पाचे अनावरण

■ **पुरंदर (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ शिल्पाचे अनावरण भारत-पाकिस्तान बॉर्डरवर भारतीय सैन्याच्या मदतीने करण्यात आले. भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने १२ फूट उंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिल्पाचे जम्मू काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात मत्सल सेक्टर येथे साडेबारा हजार फूट उंचीवरती भारतीय सेना ५६ आर आर (राष्ट्रीय रायफल्स) यांच्या सहकार्याने हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिल्पाचे अनावरण प्रदेशाध्यक्ष गणेशकाका जगताप यांच्या हस्ते करण्यातआले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यामधील माचील सेक्टर या भागामध्ये असणाऱ्या नियंत्रण रेषे नजीक ५६ आर आर या युनिटमध्ये लाईन ऑफ कंट्रोल वरती असणाऱ्या पोस्ट वरती मला झेंडावंदन करण्याचा सन्मान मिळाला तसेच हिंदूस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त मराठा महासंघातर्फे ३५० झाडांची भेट

■ **दौंड (दै. संध्या)**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकी या भावनेतून अखिल भारतीय मराठा महासंघ, दौंड शहर व तालुका यांच्या वतीने राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज, ता. दौंड, जि. पुणे यांना विविध ३१ प्रकारची ३५० झाडांची रोपे भेट देण्यात आली.


पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात रुजावा तसेच प्रशिक्षण केंद्राचा परिसर अधिक हिरवागार व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाची दखल घेत प्राचार्य जयश्री देसाई (IPS) यांनी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने प्रशंसापत्र देऊन सन्मानित केले.

या उपक्रमासाठी झाडांची रोपे आणण्यासाठी हनुमंत गाडे, डॉ. सुभाष पानसरे, प्रसाद गायकवाड, रमेश गाडे व सचिन वाबळे यांनी विशेष सहभाग घेतला. यावेळी विक्रम पवार, गणेश काकडे, उमेश वीर, रोहन घोरपडे, विजय जगदाळे व राजू निंबाळकर हे अखिल भारतीय मराठा महासंघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्राच्या वतीने कौतुक करण्यात आले. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### महाराष्ट्र सदनात रंगली रांगोळी कार्यशाळा

नवीदिल्ली:महाराष्ट्रसदनआणिदक्षिणमध्य सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्लीकरांना रांगोळी कलेचा सुंदर अविष्कार दर्शविणाऱ्या रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. यानिमित्ताने रांगोळी कार्यशाळा आणि रांगोळी स्पर्धाही घेण्यात आली. राजधानीतील नागरिकांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुप्रसिद्ध रांगोळी कलाकार गायत्री पाटील आणि प्रतीक पानसरे यांनी कार्यशाळेत सहभागी कलाकारांना विविध रांगोळी शैलींचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. संस्कार भारती, गालिचा, लँडस्केप, पोर्ट्रेट आणि पोस्टर रांगोळी यांसारख्या पारंपरिक व आधुनिक शैलींची रचना, रंगसंगती, प्रमाणबद्धता, रेषांचे नियोजन आणि कलात्मक मांडणी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सुप्रसिद्ध रांगोळी कलाकार गणेश खरे यांनी साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य रांगोळी या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. अत्यंत नेटकेपणाने साकारलेली रचना, प्रभावी रंगसंगती आणि व्यक्तिचित्रणातील जिवंतपणामुळे या रांगोळीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उपस्थितांनी या कलाकृतीचे विशेष कौतुक केले. रांगोळी स्पर्धेलाही कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध संकल्पना आणि कलाशैलींवर आधारित आकर्षक रांगोळ्या स्पर्धकांनी साकारल्या. पारंपरिक रचनांसोबतच निसर्ग, व्यक्तिचित्रे तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांचे कलात्मक सादरीकरण रांगोळ्यांच्या माध्यमातून करण्यात आले. स्पर्धेतील विविध कलाकृतींचे प्रदर्शन नागरिकांसाठी दोन दिवस खुले ठेवण्यात आले आहे. स्पर्धेत संजू गौतम यांनी प्रथम क्रमांक पटकावला. माही मित्तल आणि अनन्या मित्तल यांनी द्वितीय, तर यशोदा मनुलकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. जया व सुवर्णा तसेच मीना हरणे यांना प्रोत्साहनपर बक्षिसांनी गौरविण्यात आले.

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे १४ नवे सदस्य घोषित

मुंबई : राज्य शासनाने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या १४ नव्या सदस्यांची घोषणा केली आहे. यामध्ये शासनाने नामनिर्देशित केलेल्या पाच सदस्यांसह नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी निवडून दिलेल्या नऊ सदस्यांचा समावेश आहे. हे सदस्य अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून पाच वर्षे पदावर राहतील. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील तरतुदींनुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने याबाबत अधिसूचना जारी केली आहे. शासनाने नामनिर्देशित केलेल्या सदस्यांमध्ये डॉ. अजय गोविंद केणी, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. प्रशांत नारायण चौधरी, डॉ. राजीव येरवडेकर आणि डॉ. चंद्रशेखर गिल्लूरकर यांचा समावेश आहे. नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी निवडून दिलेल्या सदस्यांमध्ये डॉ. संतोष अप्पासाहेब कदम, डॉ. संजय साहेबराव कदम, डॉ. निलेश वसंतराव निकम, डॉ. संजय गणेशराव देशपांडे, डॉ. सुनील माधवराव इंगळे, डॉ. अनिलकुमार भास्कर पाटील, डॉ. मंगेश मधुकर गुलवाडे, डॉ. उज्वला किशनराव कराड आणि डॉ. अनिल शंकर पाचनेकर यांचा समावेश आहे.

### ७.३७ % विकास कर्ज, २०२६ ची परतफेड

मुंबई : महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ७.३७ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ अदत्त शिल्लक रकमेची १३ सप्टेंबर २०२६ पर्यंत देय असलेल्या व्याजासह ११ सप्टेंबर २०२६ रोजी (१२, १३ आणि १४ सप्टेंबर,२०२६ हे अनुक्रमे शनिवार, रविवार आणि सोमवारी सुट्टी असल्याने) सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. "परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१" अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर १४ सप्टेंबर २०२६ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही. सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४ (३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबंधित तपशिलांसह प्रदानादेशाद्वारे करण्यात येईल.

# महाराजांच्या पराक्रमाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणार

## १७ ऑगस्ट हा दिवस 'शिवचातुर्य दिन' म्हणून साजरा करण्यात येणार : मंत्री शंभूराज देसाई

■ मुंबई (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथील तत्कालीन बलशाली राजवटीच्या तावडतीतून यशस्वी सुटका या ऐतिहासिक घटनेनिमित्त 'शिवचातुर्य दिन' आग्रा येथे साजरा करण्यात आला. या उपक्रमाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'गरुडझेप संस्थेने 'शिवचातुर्य दिन" हा अभिनव उपक्रम सुरू केला असून, या माध्यमातून छत्रपती शिवरायांच्या शौर्याची,चातुर्याची आणि संयमाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे राजशिष्टाचार मंत्री तथा छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय स्मारक आग्रा चे समन्वयक जयकुमार रावल यांनी सांगितले.

पर्यटन मंत्री शंभुराज देसाई म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ ऑगस्ट १६६६ रोजी आग्रा येथून सुटका करून स्वराज्याकडे परतण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला. या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी १७ ऑगस्ट हा दिवस 'शिवचातुर्य दिन' म्हणून साजरा करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्ताने 'गरुडझेप मोहीम' पुणे येथील संस्थेच्या वतीने आग्रा ते राजगड अशी सुमारे १ हजार ३१० किलोमीटरची पायी व सायकल मोहीम आयोजित करण्यात आली आहे.

आग्रा येथे उत्तरप्रदेश शासन व महाराष्ट्र शासनाच्या समन्वयातून 'छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. याबाबत आग्रा येथील विविध तज्ज्ञांशी चर्चा केल्या आहेत. प्रकल्प संकल्पित करण्याबाबत जिल्हा प्रशासनासोबत बैठक पार पडली आहे. या स्मारकाच्या कामासाठी जागतिक किर्तीच्या प्रसिध्द वास्तुशास्त्रज्ञ आभा लांबा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील तसेच संपूर्ण देशातील पर्यटक आणि इतिहासप्रेमींसाठी हे स्मारक एक प्रेरणादायी स्थळ ठरेल. हे स्मारक राष्ट्रप्रेम, सर्वधर्मसमभाव आणि शौर्याचे प्रतीक ठरेल, मराठा साम्राज्याच्या पराक्रमाचा जागर देशात सर्वत्र पोहोचण्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण ठरेल, तसेच गरुडझेप संस्थेमार्फत दरवर्षी शिवचातुर्य मोहिमेचे आयोजनही करण्यात येणार आहे अशी माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे यांनी सांगितले.



गरुडझेप संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष मारुती गोळे यांच्या संकल्पनेतून गेल्या सात वर्षांपासून 'आग्रा ते राजगड गडदुर्ग मोहीम' आयोजित करण्यात येत आहे. ही मोहीम केवळ दुर्गभ्रमंतीपुरती मर्यादित नसून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, स्वराज्याची प्रेरणा, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन आणि व्यसनमुक्त भारताचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. या मोहिमेत सुमारे २,२०० मावळे, तसेच ६० सायकलस्वार सहभागी आहेत., उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या चार राज्यांमधून तसेच सुमारे ७८ शहरांमधून ही मोहीम मार्गक्रमण करणार आहे. आग्रा येथून सुरू झालेला हा ऐतिहासिक प्रवास ग्वाल्हेर, शिवपुरी, गुना, पाचोर, देवास, तिखरी, सेंधवा, धुळे, चांदवड, संगमनेर, भोसरी मार्गे राजगड येथे पोहोचणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेच्या घटनेचे ऐतिहासिक महत्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. 'गरुडझेप मोहीम' ही केवळ प्रवासाची मोहीम नसून, इतिहास, शौर्य, स्वराज्याची प्रेरणा आणि सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे, मोहिमेच्या समारोपावेळी राजगड येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा आणि स्वराज्याच्या इतिहासाचा जागर करण्यात येणार आहे.

यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आग्रा येथील छत्रपती शिवाजी महाराजांनी भेट दिलेल्या शिव मंदिराला भेट दिली यावेळी उत्तरप्रदेशचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री योगेंद्र उपाध्याय, महाराष्ट्राचे रोहयो मंत्री भरत गोगावले, संदीप चौधरी यांच्यासह शिवप्रेमी यांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

### विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

'शिवचातुर्य दिना'निमित्त आग्रा येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ऐतिहासिक घटना जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष टपाल आवरणाचे प्रकाशनही करण्यात आले आहे. या उपक्रमाला विविध संस्था, प्रशासन आणि नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.या मोहिमेच्या निमित्ताने आग्रा येथील ऐतिहासिक सातवंती किल्ल्याच्या विहिरीतील पवित्र जल विशेष विधीपूर्वक संकलित करून आग्रा किल्ल्यासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यावर जलाभिषेक करण्यात आला. गोमंतकातील ऐतिहासिक वारशाचे पवित्र जल शिवरायांच्या चरणी समर्पित करून गोवा व महाराष्ट्र यांच्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक नाते अधिक दृढ करण्याचाही उपक्रम यामाध्यमातून राबविण्यात येत आहे.यावेळी गोव्यातील ५० महिला कलाकार 'शिवशौर्य' या ऐतिहासिक नाट्याविष्काराद्वारे शिवकालीन पराक्रम, जिजाऊंचे संस्कार आणि स्वराज्याची प्रेरणादायी गाथा सादर करण्यात आली. या कार्यक्रमात गोव्यातील ५० महिला कलाकारांचा 'शिवशौर्य' ऐतिहासिक नाट्यप्रयोग, प्रसिद्ध कलाकार सायली जोशी गोडबोले यांचे 'राष्ट्रमाता जिजाऊ' या विषयावरील एकपात्री नाटक, प्रसिद्ध हलगीवादक विनायक सोनावणे यांचे पारंपरिक हलगी वादन तसेच कराड येथील हिंदू तेज संस्थेकडून शिवकालीन युद्धकला, दांडपट्टा आणि शौर्यप्रात्यक्षिके सादर करण्यात आली आहेत. शिवचातुर्य दिन व गरुडझेप मोहीम फ्लॅग ऑफ १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी आग्रा किल्ला परिसर, आग्रा येथे सकाळी ८.०० वा पार पडले.

# हाफकिन संस्थेला गतवैभव मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध

## राज्यमंत्री योगेश कदम : जीव-औषध निर्माण महामंडळाच्या कामकाजाचा आढावा

■ पुणे (दै. संध्या)

गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायतराज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तसेच अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज पिंपरी येथील हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळास भेट देऊन उत्पादन विभाग, सर्पालय, अश्व संवर्धन विभाग तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळेची पाहणी केली. यावेळी त्यांनी संस्थेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.



हाफकिन संस्थेची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा, अँटी-स्नेक व्हेनम सीरमचे उत्पादन वाढवावे तसेच राज्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंश उपचार किट उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. हाफकिनच्या प्रलंबित निधीबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून, यासाठी केंद्र शासनाकडेही पाठपुरावा करण्यात येईल. संस्थेच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी पुढील आठवड्यात मंत्रालयात विशेष बैठक घेण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री कदम यांनी यावेळी दिली.

हाफकिन संस्थेकडे असलेली क्षमता, प्रदीर्घ अनुभव आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा यांचा प्रभावी वापर करून संस्थेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला राज्यातील मनपाच्या तयारीचा आढावा

■ ठाणे (दै. संध्या)

खड्डेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व महानगरपालिकांनी तत्काळ कामाला लागावे. पावसाळ्यात तातडीने रस्ते बुजविण्यासाठी प्री कास्ट आणि जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, तसेच शहरातील अंतर्गत रस्ते विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवावा असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत दिले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध प्रमुख शहरांमध्ये रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री शिंदे हे दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित राहिले. या बैठकीला नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डी. गोविंदराज, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई मनपा आयुक्त कैलास शिंदे, यांच्यासह एमएमआर क्षेत्रातील कल्याण डोंबिवली, मीरा भाईंदर, उल्हासनगर,वसई – विरार, भिवंडी, पनवेल तर राज्यातील पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सांगली मिरज कुपवाड, लातूर, नांदेड, अहिल्यानगर, अकोला, इचलकरंजी, सोलापूर यासह अन्य प्रमुख महानगरपालिकांचे आयुक्त या बैठकीला उपस्थित होते.

यावेळी राज्यातील सर्वच प्रमुख शहरांमधून रस्त्यावरील खड्ड्यांच्या बाबतीत अनेक तक्रारी येत असून, या खड्ड्यांची माननीय उच्च न्यायालयाने देखील दखल घेऊन ते तातडीने बुजवण्याचे निर्देश शासनाला दिले आहेत. त्यामुळे शहरात जागोजागी पडलेले खड्डे तातडीने बुजवायला सुरुवात करावी असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सर्व मनपा आयुक्तांना सांगितले.

# मुख्यमंत्री यांनी घेतली प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसह केंद्रीय मंत्र्यांची भेट

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास आणि दळणवळण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय पर्यावरण, वन व हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण चर्चा केली.

मुख्यमंत्री फडणवीस दिल्ली दौऱ्यावर असून, त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील विविध विकासकामे, प्रलंबित प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री मोदी यांना राज्यातील प्रशासनाची सद्यस्थिती तसेच केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

राज्यातील विविध प्रकल्प वेगवेगळ्या टप्प्यांवर असून, त्यांना अधिक गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेल्या सहकार्याबाबतचे पत्रही मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री मोदी यांना दिले. महामार्ग, रेल्वे, मेट्रो, नदीजोड प्रकल्प तसेच उत्तन-विरार कॉरिडॉर यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांबाबत यावेळी चर्चा झाली. पुणे मेट्रो-३ प्रकल्पाचे काम जवळपास पूर्ण झाले असून सध्या त्याची चाचणी सुरू आहे. टाटा समूहाच्या सहकार्याने उभारण्यात आलेली ही देशातील नवीन धोरणांतर्गत पहिली सार्वजनिक – खासगी भागीदारी पद्धतीची मेट्रो आहे. चाचण्या पूर्ण झाल्यानंतर या प्रकल्पाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना निमंत्रण दिले. प्रधानमंत्री मोदी यांच्यासोबतची भेट अत्यंत सकारात्मक आणि फलदायी झाली. यापूर्वीही महाराष्ट्राने केंद्र सरकारकडे विविध प्रकल्पांसाठी सहकार्य मागितले असता केंद्राकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्याच धर्तीवर राज्यातील विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांना केंद्राच्या सहकार्याने अधिक गती देण्याचा प्रयत्न या दौऱ्यात करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मुंबई-वाढवण एक्स्प्रेसवे कनेक्टिव्हिटी अर्थात उत्तन-विरार कॉरिडॉर या महत्वाकांक्षी प्रकल्पावर विशेष चर्चा झाली. सुमारे ५५ हजार कोटींच्या या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीमार्फत (जायका) वित्तीय सहाय्य मिळविण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने सादर केला आहे. प्रकल्पाचा मोठा आर्थिक आवाका लक्षात घेता, जायकासोबत आणखी एखाद्या बहुपक्षीय वित्तीय संस्थेला सहभागी करून संपूर्ण प्रकल्पासाठी आवश्यक निधी उभारता येईल का, याबाबत केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सकारात्मक पर्याय सुचविला. महाराष्ट्र शासनाने या पर्यायाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पुढील काळात संबंधित संस्थांशी समन्वय साधून प्रस्ताव पुढे नेण्यात येणार आहे. या प्रयत्नामुळे उत्तन-विरार कॉरिडॉरच्या वित्तीय व्यवस्थेबाबत नवा मार्ग उपलब्ध झाला असून, प्रकल्पाला गती देण्यासाठी पुढील कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### देहदान ही वैद्यकीय शिक्षणाला दिलेली अमूल्य देणगी : अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील

**बारामती : दैनिक संध्या**

देहदानाला वैद्यकीय शिक्षणात अनन्यसाधारण महत्त्व असून देहदात्यांच्या योगदानामुळे भावी डॉक्टरांना मानवी शरीररचनेचा प्रत्यक्ष व सखोल अभ्यास करता येतो. देहदान ही वैद्यकीय शिक्षणाला दिलेली अमूल्य देणगी आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ अंजली पाटील यांनी केले. बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात देहदान करणाऱ्या कुटुंबीयांच्या सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार उपस्थित होते. यावेळी श्री.बिरादार यांनी देहदान व अवयवदानाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट करत समाजात व्यापक जनजागृती करुन अधिकाधिक नागरिकांनी या महान कार्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. डॉ. गीतांजली सुडके यांनी देहदानातून वैद्यकीय शिक्षण, संशोधन तसेच देहदानाची आजच्या काळाची गरज या विषयी सविस्तर विश्लेषण केले, तर डॉ. सुरज जाधवर यांनी अवयवदानातून गरजू रुग्णांना मिळणाऱ्या जीवनदानाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी देहदान करणाऱ्या दात्यांच्या नातेवाईकांचा स्मृतीचिन्ह देऊन विशेष सन्मान करून त्यांच्या महान मानवतावादी निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान देहदान व अवयवदानाबाबत समाजात असलेल्या गैरसमज व शंकांचे निरसन दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला उपअधिष्ठाता डॉ. सचिन दगडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश उमाप तसेच प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. विवेक सहस्त्रबुध्ये, डॉ. लीना नकाते, डॉ. राजेश हिरे, डॉ. विनय टापरे, डॉ. किरण जाधव, डॉ. सुजाता धर्मशाळे आणि विद्यार्थी, देहदात्यांचे नातेवाईक, पत्रकार, कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे श्री. किरण घुगे यांनी आभार मानले.

### राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी मारुती शिंदे बिनविरोध

**पुणे : दैनिक संध्या**



मारुती शिंदे महेश घुले

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, पुणे जिल्हाध्यक्षपदी मारुती रामभाऊ शिंदे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली. कार्यकारिणीची त्रैवार्षिक निवडणूक नुकतीच मध्यवर्ती इमारत येथे बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी रामचंद्र दशरथ अभंगराव यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा केली. संघटनेच्या प्रत्येक पदासाठी एकच उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने सर्व पदाधिकारी बिनविरोध निवडले गेले. कार्याध्यक्षपदी दीपक चव्हाण, कोषाध्यक्षपदी विजय लांघे, सरचिटणीसपदी पैलवान प्रा. महेश घुले, कार्यालयीन सचिवपदी सोमनाथ जाधव, सहकोषाध्यक्षपदी अविनाश तळेकर, तर संघटकपदी भाग्यशाली लोखंडे व एस. व्ही. सानप यांची निवड झाली. प्रसिद्धी प्रमुखपदी प्रशांत आवळे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी दिनेश कुचेकर, कृष्णा साळवी, नंदकिशोर भरेकर, सदानंद मोरडे, संजय कडाळे, बाळासाहेब चौधरी, संध्याताई काजळे, सुनील चोरामले, दीपक धीवार, विष्णू माने, प्रशांत पवार, ज्ञानेश्वर कापसे, शंकर शिंदे, प्रवीण इगवे, अरुण काळे, मनोहर परमार, बसवराज कलागदी, नसरुद्दीन शेख आणि प्रज्ञा गायकवाड, तर सहसचिवपदी अनिकेत साळुंखे, राजेंद्र ढवळे, सिद्धेश्वर गोवेकर, सोपान भोसले, रवींद्र मुळे, विजय नरोटे, वैभव चव्हाण, ज्ञानेश्वर शिरसागर, राजेंद्र चव्हाण व विद्या जाधव यांची निवड करण्यात आली. यावेळी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'एनपीएस'ऐवजी जुनी पेन्शन योजना प्रभावीपणे लागू करावी, सर्व विभागांतील रिक्त पदे सरळसेवेने तातडीने भरावीत, शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सरळसेवेने भरती करावी, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती तातडीने द्यावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, अनुकंपा भरती १०० टक्के एकाचवेळी करावी, कॅशलेस आरोग्य योजना लागू करावी, महागाई भत्ता केंद्राप्रमाणे वेळेवर व त्रुटीविरहित लागू करावा, बालसंगोपन रजा दोन वर्षांची करावी, विविध विभागांचे आकृतिबंध व सेवा प्रवेश नियम तातडीने मंजूर करावेत, या व कर्मचाऱ्यांच्या अन्य प्रलंबित मागण्यांबाबत शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची पुढील दिशा निश्चित करण्यात आली. "नवनिर्वाचित कार्यकारिणी पुणे जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न चांगल्या पद्धतीने हाताळून मार्गी लावेल, अशी अपेक्षा आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो," असे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विश्वास काटकर यांनी सांगितले.

### 'सूर्यदत्त'तर्फे ११ वीरपत्नींना 'वीर नारी सन्मान' प्रदान; राष्ट्रभक्तीचा जल्लोष

**पुणे : दैनिक संध्या**



भारताच्या स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्षाचे औचित्य साधून सूर्यदत्त शिक्षण संस्थेतर्फे १४ ते २२ ऑगस्ट या कालावधीत आयोजित विशेष स्वातंत्र्यदिन उपक्रम सप्ताहाचा सूर्यदत्तच्या बावधन कॅम्पसमध्ये दिमाखदार, देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. या निमित्ताने ११ वीरपत्नींना 'वीर नारी सन्मान', प्रसिद्ध गायक जितेंद्र भुरुक व त्यांच्या टीमचा ८० देशभक्तीपर गीतांचा विशेष कार्यक्रम यामुळे सूर्यदत्त कॅम्पस अक्षरशः देशभक्ती, अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेने भारून गेला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या दमदार आणि प्रेरणादायी भाषणाने कार्यक्रमाला विशेष ऊर्जा मिळाली. संस्थेच्या उपाध्यक्षा व सचिव सौ. सुषमा चोरडिया यांचेही या उपक्रमाला मोलाचे मार्गदर्शन लाभले. देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीर जवानांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करत ११ वीरपत्नींचा 'वीर नारी सन्मान' करण्यात आला. त्यांच्या त्याग, धैर्य, संयम आणि देशनिष्ठेला अभिवादन करणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक ठरला. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सुषमा चोरडिया यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, तिरंगा महावस्त्र, सन्मानपत्र आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेला फेटा प्रदान करून वीरपत्नींना गौरविण्यात आले. देशाच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या कुटुंबीयांप्रती समाजाची कृतज्ञता व्यक्त करणारा हा सन्मान सोहळा स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवातील अत्यंत हृदयस्पर्शी क्षण ठरला. स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्षाच्या औचित्याने प्रसिद्ध गायक जितेंद्र भुरुक आणि त्यांच्या टीमने तब्बल ८० देशभक्तीपर गीतांचा विशेष कार्यक्रम सादर केला. विविध भारतीय भाषांतील गीतांमधून भारताच्या विविधतेचे, स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे, शौर्याचे, राष्ट्रीय एकात्मतेचे आणि देशाच्या अभिमानाचे प्रभावी दर्शन घडले. गीतांच्या प्रत्येक सादरीकरणाला विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# चोरीच्या विदेशी दारूसह दोघांना अटक

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांच्या मार्गदर्शनाखाली कामगिरी; मुद्देमाल जप्त**



■ **पुणे (दै. संध्या)**

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तसेच अवैध शस्त्रे, चोरीच्या घटना आणि अन्य बेकायदेशीर कृत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी येरवडा पोलिसांनी विशेष गस्त आणि तपास मोहीम राबवली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत चोरीच्या विदेशी दारूच्या सहा बाटल्यांसह दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत तब्बल २७ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त संजय दराडे आणि अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील यांनी येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे प्रतिबंधक कारवाई अधिक प्रभावी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या सूचनांची अंमलबजावणी करत वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांनी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाला सतर्क राहून संशयित व्यक्ती, वाहनचोरी तसेच अवैध वस्तूंची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक येरवडा परिसरात गस्त घालत होते. यावेळी पोलीस अंमलदार संदिप जायभाय यांना जी.एस.टी. कार्यालयाजवळ काही इसम संशयास्पदरीत्या थांबले असून, त्यांच्याकडे चोरीचे साहित्य असण्याची शक्यता असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

ही माहिती त्यांनी तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांना दिली. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गिते यांनी तत्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांच्या आदेशानुसार तपास पथकाने मिळालेल्या माहितीची खातरजमा केली असता सह्याद्री रुग्णालयाकडून जी.एस.टी. कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मोकळ्या जागेत दोन इसम संशयास्पदरीत्या थांबलेले आढळून आले. पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता त्यांनी तेथे थांबण्याबाबत समाधानकारक माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यातील बॅगेची तपासणी करण्यात आली. बॅगेमध्ये विदेशी दारूच्या सहा बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी त्यांच्याकडे दारूच्या बाटल्यांबाबत विचारणा केली असता त्यांना समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही.

## बारामती तायक्वांदो अकॅडमीची दमदार कामगिरी; २१ पदकांची कमाई

**आंतरजिल्हा तायक्वांदो स्पर्धेत खेळाडूंचे घवघवीत यश; ८ सुवर्ण, ५ रौप्य व ८ कांस्यपदकांवर मोहोर**

■ **बारामती (दै. संध्या)**



बारामती येथील तायक्वांदो अकॅडमीची विद्यार्थ्यांनी १६ ऑगस्ट रोजी येरवडा,पुणे येथे पार पडलेल्या प्रथम अंतर जिल्हा तायक्वांदो चैम्पियनशिप 2026 या तायक्वांदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत तब्बल २१ पदकांची कमाई केली. विविध वयोगट व वजनगटांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत ८ सुवर्ण, ५ रौप्य आणि ८ कांस्यपदकांवर आपले नाव कोरले.

स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्यांमध्ये ईश्वरी हिंगसे,आरोही जंत्रे,पार्थ मोरे,शौर्य शेडगे,आयुष बिकड, आराध्या साळुंखे,देव गायकवाड आणि आशिष लाळगे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. तर आस्था साळुंखे,सिद्धी नाडे, उन्नती शहा,निखिल बुरुंगे आणि ईशान संकपाळ यांनी रौप्यपदक पटकावले. कांस्यपदकाच्या यशात स्मित नांगरे,वैष्णवी साळुंके, शआर्यन राठोड,वेदांत शिंदे,राधेश्याम नवले, संयोज पंढरपट्टे,शिवांश गुंड आणि इशिका नलावडे यांनी मोलाची भर घातली.

या सर्व खेळाडूंनी स्पर्धेत दाखवलेल्या उत्कृष्ट खेळाचे आणि मिळवलेल्या घवघवीत यशाचे बारामती तायक्वांदो अकॅडमीच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.खेळाडूंच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण,कठोर परिश्रम,शिस्त आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन या मध्ये दिपक मोरे,विशाल माने,विशाल शेंडगे यांचा मोठा वाटा आहे.

"मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर बारामतीच्या खेळाडूंची विजयाची भरारी!" या यशामुळे बारामती तायक्वांदो अकॅडमीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, आगामी स्पर्धांमध्येही खेळाडूंकडून अशाच दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## जेजुरी गडावरून श्रेयाळशेठची मिरवणूक

■ **जेजुरी (दै. संध्या)**

श्रेयाळ षष्ठी निमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावरून औट घटकाचा राजा असणाऱ्या श्रेयाळशेठची विधिवत पूजा करून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकी नंतर श्रेयाळशेठचे विसर्जन करण्यात आले. धार्मिक परंपरे नुसार नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी षष्ठीला मानकरी असणाऱ्या डिखळे भालेराव, कोळी समाजाच्या वतीने श्रेयाळशेठ व त्याच्या राजवाड्याची प्रतिकृती तयार करण्यात आली. सायंकाळी श्रेयाळशेठची खंडोबा मंदिरात पूजा करण्यात आली. पूजेनंतर गुरव कोळी वीर घडशी पुजारी सेवक वर्गाच्या वतीने वाजत गाजत मिरवणूक काढून मंदिर प्रदक्षिणा करण्यात आली.जेजुरी गडावरून ही मिरवणूक चिल्लाल विहिरीकडे आणून पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त, पुजारी सेवक वर्ग, ग्रामस्थ, उपस्थित होते.

## अपोलो हॉस्पिटल्स : हेल्थकेअर उपक्रम जाहीर

■ **पुणे (दै. संध्या)**



अपोलो हॉस्पिटल्सने आज 'ऑलवेज ओपन. ऑलवेज हिअर.' या उपक्रमाची घोषणा केली. हा एक पहिल्यांदाच सुरू केलेला उपक्रम आहे ज्यामुळे नियमित आणि नियोजित आरोग्य सेवा आठवड्याच्या सातही दिवसांमध्ये, रविवारीसुद्धा, उपलब्ध होणार आहेत. अपोलोची आपत्कालीन सेवा, क्रिटिकल केअर आणि इनपेशंट सेवा नेहमीच 24x7 उपलब्ध राहिल्या आहेत. या नव्या उपक्रमामुळे आता रविवारीसुद्धा ओपीडी कन्सल्टेशन, डायग्नॉस्टिक्स, प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेक्स, फॉलो-अप कन्सल्टेशन आणि नियोजित प्रक्रियांचा लाभ घेता येईल. यामुळे रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय आठवड्याच्या दिवसांची वाट न पाहता योग्य वेळी आरोग्य सेवा घेऊ शकतील. भारतातील अनेक कामकाज करणाऱ्या लोकांसाठी वेळ हा वेळेवर आरोग्य सेवा घेण्यातील सर्वात मोठा अडथळा ठरतो. व्यस्त कामाचे वेळापत्रक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि आठवड्याचे नियोजन यामुळे लोक अनेकदा कन्सल्टेशन, तपासण्या आणि हेल्थ चेक्स पुढे ढकलतात. अपोलोच्या 'हेल्थ ऑफ द नेशन 2026' रिपोर्टमध्ये लठ्ठपणा, हायपरटेन्शन, डायबेटीस आणि मेटाबॉलिक डिसऑर्डर्स यांसारख्या लाइफस्टाइल आजारांचे वाढते ओझे दाखवले आहे, जे भारतीयांना त्यांच्या सर्वाधिक उत्पादक वयात प्रभावित करत आहेत. अहवालात पुढे नमूद केले आहे की अपोलोच्या भारतभरातील इकोसिस्टममधून 2.5 मिलियनहून अधिक व्यक्तींवर केलेल्या हेल्थ स्क्रिनिंगच्या आधारे, एक 'सायलेंट एपिडेमिक' वाढत आहे. लाखो लोक कोणतीही दिसणारी लक्षणे नसतानाही निदान न झालेल्या क्रॉनिक कंडिशन्ससह जगत आहेत.

## पांडुरंगाच्या महाद्वारी 'नामयज्ञ सोहळा'

■ **पुणे (दै. संध्या)**



श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्ट यांच्या वतीने चातुर्मासातील श्रावणी मासामध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठलाचे महाद्वार वीणा मंडपात 'नामयज्ञ सोहळा' हरिनामाच्या गजरात उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे आयोजन श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, श्री शिवशंकर सांप्रदायिक भजनी मंडळ आणि पंचक्रोशी वारकरी संप्रदाय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

पहाटे काकडा आरती, नामस्मरण, प्रवचन, हरिपाठ, हरिजागर आणि सकाळी आणि सायंकाळी हरिकीर्तन असे सोहळ्याचे स्वरूप होते. ह.भ.प. सदाशिव महाराज बैकर, चंद्रकांत महाराज मांडवकर, जगन्नाथ महाराज सकपाळ, सुधाकर महाराज बगडे, दत्ताराम महाराज आयरे, अक्षय महाराज मते, काल्याचे कीर्तन निवृत्ती महाराज मुकनाक यांचे झाले. ह.भ.प. प्रवीण महाराज भागडे, महादेव महाराज जाबरे आणि प्रकाश महाराज सोलकर यांचे प्रवचन झाले. यावेळी श्रीसंत नामदेव महाराजांचे सोळावे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास (पंढरपूर) यांच्या हस्ते 'श्री संत सेवा गौरव पुरस्कार' ह.भ.प. दत्ताराम महाराज आयरे (चिपळूण) आणि ह.भ. प. शंकर महाराज भारदे (दापोली) यांना प्रदान करण्यात आला. शंकर महाराज भारदे म्हणाले, मला अनेक पुरस्कार मिळाले परंतु अध्यात्म आणि समाज प्रबोधनातून हा मिळालेला 'संत सेवा पुरस्कार' माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे.

*पंढरीचा महिमा ।। देता आणीक उपमा ।।*
*ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ।।*
*आहेति सकळ । तीर्थे काळें देती फळ ।।*
*तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ।।*

तुकाराम महाराजांनी अभंगात म्हटल्याप्रमाणे या भूवरील वैकुंठाचा निरोप घेताना सर्व भाविकांचे डोळे पाण्याने भरून आले होते. कार्यक्रमाचे हे पाचवे वर्ष असून तीन हजार जणांनी या नामयज्ञ सोहळ्याचा लाभ घेतला. रामकृष्ण हरीच्या ठेक्यात आणि टाळ-मृदंगाच्या तालावर पावल्या तर महिला भाविकांनी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा केला. सर्व विठ्ठलभक्त भक्तिरसात न्हाऊन निघाले. सोहळ्यात महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सत्कार आणि स्वागत श्रीक्षेत्र नामयज्ञ सोहळा ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. निवृत्ती महाराज मुकनाक आणि उपाध्यक्ष काशिनाथ महाराज शिगवण यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद महाराज राणे यांनी केले. आभार जगन्नाथ महाराज सकपाळ यांनी मानले.

# पुणे येथील 'पीएफ'च्या कार्यालयाचे विभाजन केवळ कागदोपत्रीच

## तब्बल तीन वर्षांपासून तीनही कार्यालयांचा कारभार चालतो एकाच इमारतीतून!

■ अपुऱ्या जागेमुळे निवृत्तीवेतनधारक, कर्मचारी आणि नियोक्ता आस्थापनांची होतेय मोठी गैरसोय

■ **पुणे (दै. संध्या)**




पुणे शहरातील निवृत्तीवेतनधारक व भविष्य निर्वाह निधीचा (PF) लाभ घेणाऱ्या सदस्यांची संख्या वाढत असल्याने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या पुणे येथील विभागीय कार्यालयावरील कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या कार्यालयावरील कामाचा ताण कमी करण्यासाठी व वयोवृद्ध निवृत्तीवेतनधारकांना वेळेत सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने सुमारे तीन वर्षांपूर्वी पुणे कँटोन्मेंट बोर्डाच्या इमारतीतील विभागीय कार्यालयाचे विभाजन करून विमाननगर येथे अतिरिक्त प्रादेशिक कार्यालयाची स्थापना केली. मात्र, हे विभाजन केवळ कागदोपत्रीच राहिल्याचे दिसून येत आहे. भविष्य निर्वाह निधीच्या (पीएफ) विभागीय कार्यालयाचे विभाजन होऊन तीन स्वतंत्र कार्यालये अस्तित्वात आली आहेत. परंतू,या तीनही कार्यालयांचा कारभार आजही एकाच इमारतीतून सुरू आहे. परिणामी, या कार्यालयांसाठी एकच इमारत अपुरी पडत असून तेथे मोठ्या प्रमाणात गर्दी आणि जागेची कमतरता निर्माण झाली आहे. अपुऱ्या जागेमुळे निवृत्तीवेतनधारक, भविष्य निर्वाह निधी सदस्य, कर्मचारी तसेच नियोक्ता आस्थापनांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या पुणे विभागीय कार्यालयाचे (झोनल ऑफीस) विभाजन करून अन्य दोन स्वतंत्र प्रादेशिक कार्यालये निर्माण करण्यात आली आहेत. यामध्ये कँटोन्मेंट पुणे आणि विमाननगर अशा दोन प्रादेशिक कार्यालयांचा समावेश आहे. सध्या ही तीनही कार्यालये पुण्यातील पुलगेट पीएमपी बसस्थानकाजवळील गोळीबार मैदान येथील पुणे कँटोन्मेंट बोर्डाच्या इमारतीत कार्यरत आहेत.

केंद्र सरकारने दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी पुण्यातील विद्यमान विभागीय कार्यालयाचे विभाजन करून विमाननगर येथे अतिरिक्त प्रादेशिक कार्यालयाची स्थापना केली आहे. या पुनर्रचनेनंतर सर्व संबंधित कार्यालयांनी आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्रपणे कार्यरत होणे अपेक्षित होते. तरंच विभाजनाचा खरा उद्देश साध्य झाला असता आणि भविष्य निर्वाह निधी सदस्य, वर्गणीदार, निवृत्ती-वेतनधारक व नियोक्ता आस्थापनांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळाला असता, असे मत अपुऱ्या सुविधांच्या त्रस्त झालेल्या वयोवृद्ध निवृत्तीवेतनधारकांनी व्यक्त केले आहे.

विमाननगर येथील कार्यालयाने विमाननगर किंवा खराडी, नगर रोड, हडपसर औद्योगिक वसाहत आणि हडपसर परीसरात कार्यरत होणे अपेक्षित होते. मात्र, जवळपास तीन वर्षे उलटूनही ही कार्यवाही झालेली नाही. प्रत्यक्षात, नव्याने स्थापन करण्यात आलेले विमाननगर येथील प्रादेशिक कार्यालय हे गेल्या तीन वर्षांपासून गोळीबार मैदान येथील मूळ विभागीय कार्यालयाच्या इमारतीतच कार्यरत आहे.

### पुण्यातील एकाच ठिकाणी कार्यरत असलेली कार्यालये

- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, विभागीय कार्यालय, पुणे झोन, गोळीबार मैदान, पुणे.
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, पुणे कँटोन्मेंट, पुणे.
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, विमाननगर, पुणे.

### 'पीएफ' कार्यालये एका दृष्टीक्षेपात

- पुणे शहरातील एकूण कार्यालये : ०४
- सर्व कार्यालयांमध्ये कार्यरत वरिष्ठ अधिकारी : ८४.
- या कार्यालयांमध्ये कार्यरत कर्मचारी : ४२४.
- अन्य कर्मचारी/स्टाफ : १९४.
- या कार्यालयांशी संलग्न आस्थापना : २४,०७३.
- एकूण सहभागी सदस्य : २४,२७,९६७.